नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर -४४००१८

संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ /९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

www.dainikmahasagar.in / Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

* वर्ष ५० * अंक २९३ * * अमरावती * शनिवार, दिनांक १९ एप्रिल २०२५ ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त

## माजी सीएम जगन रेड्डींचे शेअर्स जप्त

■ वृत्तसंस्था, हैदराबाद, दि. १८ :
अंमलबजावणी संचालनालयाने (ईडी) आंध्र प्रदेशचे माजी मुख्यमंत्री आणि वायएसआर काँग्रेसचे प्रमुख वायएस जगन मोहन रेड्डी यांचे २७.५ कोटी रुपयांचे शेअर्स तात्पुरते जप्त केले आहेत. मनी लाँड्रिंगच्या १४ वर्षे जुन्या प्रकरणात ही कारवाई करण्यात आली आहे. ज्यामध्ये 'क्विड प्रो क्वो' (काहीतरी मिळवण्याच्या बदल्यात काहीतरी देणे) गुंतवणुकीचे आरोप आहेत.

ईडीच्या हैदराबाद टीमने जगनच्या तीन कंपन्यांमधील गुंतवणूक जप्त केली आहे. त्यात कार्मेल एशिया होल्डिंग्ज, सरस्वती पॉवर आणि हर्षा फर्म या कंपन्यांचा समावेश आहे.

अग्राग्रलेख

## खरीखरी..

## सर्वोच्च न्यायालयाचे भूषण

परवा अमरावतीतून विमानाचे उड्डाण सुरू झाले. काल देशाच्या सरन्यायाधीश पदावर उड्डाण केले. आता नागपूर आणि मुंबईत अनेक वर्ष वकिली करणाऱ्या विदर्भ पुत्राला आता देशातील सर्वोच्च न्यायालयाचे मुख्यपद माझेच सरन्यायाधीश पद मिळालेले आहे. सध्याचे सरन्यायाधीश खन्ना साहेब आहेत. ते १३ तारखेला पदमुक्त होणार आणि त्यानंतर देशाचे ५२ वे सरन्यायाधीश भूषण गवई होणार आहेत. या पदावर नागपूरचे तिसरे सरन्यायाधीश म्हणून न्यायमूर्ती भूषण गवई यांचे नाव आता इतिहासात लिहिण्यात आलेले आहे. नागपूरचे पहिले सरन्यायाधीश हिदायत्तुला उपराष्ट्रपती झाले होते. दुसरे न्यायमूर्ती बोबडे आणि आता थेट नागपुरात वकीली केलेले अमरावतीचे सुपुत्र गवई साहेब पुढील जवळ जवळ सात महिने या पदावर राहतील. आपल्या महाराष्ट्रातील आरपीआयचे मोठे नेते रा. सू. गवई आणि डॉक्टर कमलताई गवई यांचे हे सुपुत्र आहेत. रा. सू. गवई आपल्या पक्षाचे एकमेव आमदार होते. पण त्यांना विधान परिषदेचे उपसभापती व त्यानंतर सभापती म्हणून बिनविरोध निवडले गेले होते. हे कुटुंब जरी राजकारणात असले. तरी न्यायमूर्ती गवई म्हणजेच भूषण गवई एक अभ्यासू व्यक्ती म्हणून गणले जातात. त्यांचा जन्म अमरावतीचा आहे. कायद्याची पदवी त्यांनी मुंबई विद्यापीठातून मिळवली. चाळीस वर्षांपूर्वी ज्यांनी बॅरिस्टर राजा भोसले यांना गुरुस्थानी मानून मुंबईत वकिली सुरू केली. त्या भूषण गवई यांची अभ्यासूवृत्ती आणि कायद्याचे जबरदस्त ज्ञान यामुळे ते मुंबईत चांगलेच लोकप्रिय झाले. आपल्या वकिलीच्या काळात वंचित आणि उपेक्षितांचा जिव्हाळा त्यांनी अगदी काटेकोरपणे जपला. वीस वर्ष मुंबई आणि नागपूर येथे वकिली केल्यावर 2005 साली त्यांना उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती म्हणून नियुक्त करण्यात आले. त्यांनी महाराष्ट्रातील ज्या ज्या ठिकाणी उच्च न्यायालयाचे बेंच होते. त्या प्रत्येक ठिकाणी न्यायदानाचे काम केलेले आहे. जवळपास पंधरा वर्षे मुंबई उच्च न्यायालयात न्यायाधीश पद सांभाळल्यावर 2019 साली त्यांना सर्वोच्च न्यायालयात न्यायाधीश म्हणून बढती मिळालेली आहे. जम्मू-काश्मीरला विशेष दर्जा देणारे 370 कलम ज्या घटनापीठाने मंजूर केले. त्यात गवई यांचाही वाटा आहे. तत्पूर्वी रात्री आठ वाजता अचानक पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नोटबंदी जाहीर केली होती. त्याला वैध ठरवण्याचा निर्णय देणारे न्यायमूर्ती गवईच होते. त्यासोबत इतरही अनेक महत्त्वाचे निर्णय त्यांनी दिलेले आहेत. या आपल्या देशातील लोकशाहीला ललामभूत ठरेल अशी त्यांची कारकीर्द आहे. त्यांच्या सरन्यायाधीश पदाचा योग आता आल्यामुळे त्यांचे शहर अमरावती सध्या अतिशय आनंदाच्या उड्डाणात दंग आहे. न्यायमूर्ती भूषण गवळी यांचा कार्यकाल तसे पाहिले. तर काही महिनेच म्हणजे अवघे सात-साडेसात महिने आहे. पण हा कालखंड अतिशय संवेदनशील मुद्द्यांवर निर्णय देण्याचा राहणार आहे. आता त्यांच्या निस्पृहते बाबत म्हणजेच पारदर्शकपणा बाबतही सांगायलाच हवे. त्यांची पारदर्शक निस्पृहता अशी होती की, राहुल गांधी यांना गुजरातच्या छोट्या म्हणजेच जिल्हा न्यायालय आणि उच्च न्यायालयाने दोन वर्षांची शिक्षा सुनावली होती. त्यानंतर हे प्रकरण ज्यांच्या समोर आले. ते हेच गवई साहेब होते. तेव्हा सर्वोच्च न्यायालयात त्यांनी स्पष्टपणे सांगितले होते की, माझे कुटुंब काँग्रेसचे सहप्रवासी होते. 'तुम्हाला काही हरकत असेल तर यातून मी बाहेर पडतो'. परंतु प्रतिपक्षाने त्यांच्यावर संपूर्ण विश्वास टाकला आणि त्यांनी कायद्याच्या आधारे राहुल गांधींची शिक्षा रद्द करून टाकली. अशा प्रकारे सर्वसमावेशी आणि आपल्या पदाला न्याय देणारे म्हणून भूषण गवई न्यायालयीन वतुर्ळात मानाचे स्थान मिळवून आहेत. यात कोणतेही दुमत नाही. त्यांच्या छोट्याशा कारकिर्दीत ते आपला सर्वसमावेशी विचार जागृत ठेवून न्याय देतील. त्यासोबतच सर्वांमध्येच लोकप्रिय असलेल्या आणि राज्यपाल पदावर आरुढ झालेल्या आपल्या वडिलांप्रमाणेच आपले नाव न्यायदानाच्या परिघामध्ये यशस्वी करतील यात शंकाच नाही. त्यासाठीच त्यांना नागपूर, अमरावती, विदर्भ आणि संपूर्ण महाराष्ट्राकडून कोटी कोटी शुभेच्छा!

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

# अपघातग्रस्तांवर १ लाख रुपयांपर्यंत
# कॅशलेस उपचार

### फडणवीस सरकारचा मोठा निर्णय : आरोग्य मंत्र्यांचे महत्त्वपूर्ण निर्देश







■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. १८ :
अपघातग्रस्तांवर वेळेवर उपचार होण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वातील महायुती सरकारने एक महत्त्वाचा निर्णय घेतला आहे.

या निर्णयानुसार, सरकारने अपघातग्रस्त रुग्णांवर १ लाख रुपयांपर्यंतचे कॅशलेस उपचार उपलब्ध करून देण्याच्या सूचना संबंधितांना दिल्या आहेत. या निर्णयाचा आपत्कालीन स्थितीत रुग्णालयात दाखल होणाऱ्या रुग्णांना मोठा लाभ होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांच्या नेतृत्वात आज राज्य आरोग्य हमी सोसायटीच्या वरळी येथील मुख्यालयात आयुष्मान भारत पंतप्रधान जन आरोग्य योजना व महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेच्या कामकाजाच्या आढावा बैठक झाली.

या बैठकीत प्रकाश आबिटकर यांनी आपत्कालीन स्थितीत दाखल होणाऱ्या रुग्णांना उपचाराअभावी प्राण गमवावे लागू नयेत यासाठी त्यांच्यावर विविध योजनांमध्ये अंगीकृत असणाऱ्या रुग्णालयांत १ लाख रुपयांपर्यंत कॅशलेस उपचार करण्याचे निर्देश दिलेत.

महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेत अंगीकृत असलेल्या रुग्णालयांनी महिन्यातून एकदा आरोग्य शिबिराचे आयोजन करून किमान ५ रुग्णांवर कॅशलेस उपचार करावेत. यासंबंधी योग्य ती पाऊले उचलावीत, असे निर्देशही आबिटकर यांनी यावेळी अधिकाऱ्यांना दिले.

शासकीय आरोग्य योजनांतील सुधारणांसाठी सरकारने एक समिती स्थापन केली आहे. ही समिती पुढील एक महिन्यात आपला अहवाल सादर करणार आहे.

उल्लेखनीय बाब म्हणजे पुण्यातील दीनानाथ रुग्णालयाने पैशांअभावी एका गर्भवती महिलेला उपचार नाकारले होते. त्यानंतर उपचाराला विलंब झाल्यामुळे तिचा मृत्यू झाला होता. या प्रकरणी राज्यभरात आरोग्य व्यवस्थेविषयी संतापाची लाट उसळली होती.

या पार्श्वभूमीवर रुग्णालयांना चाप बसवणे व राज्यातील जनतेला योग्य दरात व तत्काळ उपचार मिळावेत, यासाठी काय उपाययोजना करता येतील याची चर्चा करण्यासाठी आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांच्या नेतृत्वात या आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. त्यात हे निर्देश दिले गेले.

## कृषिमंत्री माणिक कोकाटेंना फडणवीसांनी लावला चाप

### बदल्यांचे अधिकार स्वतःकडे घेतले





■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १८ :
वादग्रस्त विधानांमुळे चर्चेत राहणारे कृषीमंत्री माणिक कोकाटे यांना लगाम घालण्यास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सुरुवात केली आहे. कृषी विभागातील बदल्यांचे कोकाटे यांचे अधिकार देवेंद्र फडणवीस यांनी काढून स्वतःकडे घेतले आहेत. कृषी खात्यांमधील बदल्या आणि अन्य कामांच्या मोठया प्रमाणावर तक्रारी देवेंद्र फडणवीस यांच्याकडे आल्या आहेत. त्यामुळे त्यांनी बदल्यांच्या तक्रारींकडे प्राधान्याने लक्ष दिले आहे.

मध्यंतरी कोकाटे यांनी पीए-पीएसच्या नियुक्त्यांवर थेट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर हल्लाबोल केला होता. आमचे पीएस-ओएसडी देखील मुख्यमंत्रीच ठरवतात. आमच्या हातात काही राहिलेले नाही. आता कृषि संचालक, सह संचालक आणि अधिक्षक कृषि अधिकाऱ्याच्या बदलीचे अधिकार मुख्यमंत्री फडणवीसांकडेच असतील. कोकाटे यांनी काही दिवसांपूर्वी शेतकऱ्यांच्या कर्जमाफीविषयीही वादग्रस्त वक्तव्य केले होते. त्यामुळे अजित पवारही त्यांच्यावर नाराज आहेत.

## महिला वकिलाला बेदम मारहाण

### बीड जिल्हा पुन्हा हादरला : सर्व स्तरातून निषेध



■ वृत्तसंस्था, बीड, दि. १८ :
सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणामुळे चर्चेत असणाऱ्या बीड जिल्ह्यात आता एका महिला वकिलाला गावच्या सरपंच व त्याच्या गुंडांनी बेदम मारहाण केल्याची संतापजनक घटना उजेडात आली आहे.

सदर महिला वकिलाने पत्रकारांशी बोलताना या संपूर्ण घटनेचा वृत्तांत सांगितला. यावेळी तिला बसताही येत नव्हते. या मारहाणीत तिची पाठ अक्षरशः संतोष देशमुखांसारखीच काळी-निळी झाली असून, रक्तही सांगळले आहे. या घटनेवर तीव्र प्रतिक्रिया उमटत आहेत.

पीडित महिला वकील अंबाजोगाई सत्र न्यायालयात वकिली करते. ज्ञानेश्वरी अंजान असे तिचे नाव आहे. त्या म्हणाल्या, गावातील एका मंदिरात मोठ्या आवाजात भोंगा वाजत होता. मी त्यावेळी अभ्यास करत होते. जास्त आवाजामुळे माझे लक्ष अभ्यासात लागत नव्हते. त्यावेळी सरपंच अनंत अंजान यांना मी फोन करून भोंग्याचा आवाज कमी करण्याची विनंती केली.

त्यानंतर त्यांनी मी कर्मचाऱ्याला आवाज कमी करण्यास सांगतो असे सांगितले. पण दोन तास झाले तरी आवाज कमी झाला नाही. त्यामुळे मी पुन्हा त्यांना फोन केला. तेव्हा त्यांनी कर्मचारी माझा फोन उचलत नसल्याचे त्यांनी सांगितले.

परिणामी, मी संबंधित कर्मचाऱ्याच्या घरी जाऊन देवळातील भोंग्याचा आवाज कमी करण्याची विनंती केली. पण त्या कर्मचाऱ्याने मांसाहारी भोजन केल्याने मंदिरात जाऊ शकत नाही असे सांगत आवाज कमी करण्यास नकार दिला. त्यानंतर मी पुन्हा सरपंचांना या प्रकाराची माहिती दिली. तेव्हा त्यांनी पोलिसांत तक्रार देण्याची सूचना केली.

पोलिसांनी हस्तक्षेप करून भोंग्याचा आवाज कमी केला. त्यानंतर दुसऱ्याच दिवशी सरपंच व त्याच्या लोकांना घेऊन माझ्या घरी आले. आईबाबांना धमक्या दिल्या आणि नंतर मला बेदम मारहाण करण्यात आल्याचे या महिला वकिलाने सांगितले.

दरम्यान, या प्रकरणाचा सर्व स्तरातून निषेध होत असून सरकारने कठोर कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत.

## फास्टॅग प्रणालीच लागू

### सॅटेलाइट टोल प्रणाली लागू नाही

■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. १८ :
रस्ते वाहतूक मंत्रालयाने १ मे २०२५ पासून फास्टॅग बंद करण्याच्या वृत्ताला अफवा म्हटले आहे. मंत्रालयाने म्हटले आहे की, हे अहवाल अफवा आहेत आणि फास्टॅग ही देशात टोल वसुलीची अधिकृत पद्धत राहील.

यापूर्वी असे वृत्त आले होते की, १ मे पासून फास्टॅग बंद केले जाईल आणि सॅटेलाइट टोल प्रणाली लागू केली जाईल. यावर मंत्रालयाने सांगितले की राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने असा कोणताही निर्णय घेतलेला नाही. सॅटेलाइट टोल सिस्टीमऐवजी, सरकार एका नवीन बॅरियर-लेस टोल सिस्टीमची चाचणी घेत आहे. यामध्ये, ऑटोमॅटिक नंबर प्लेट रेकग्निशन कॅमेरे आणि फास्टॅग एकत्र करून, वाहने न थांबवता त्यांचा टोल कापला जाईल, ज्यामुळे वाहतूक कोंडी आणि वेळ वाचेल. सरकार अडथळारहित टोल प्रणालीची चाचणी घेत आहे.

## धनंजय मुंडेंची आमदारकी संकटात



■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १८ :
निलंबित पोलिस अधिकारी रणजित कासलेने परळी विधानसभा मतदारसंघातील ईव्हीएमच्या स्ट्राँगरूमपासून दूर जाण्यासाठी आपल्याला धनंजय मुंडे यांच्या माणसाने आपल्या खात्यावर १० लाख रुपये टाकल्याचा आरोप केला आहे.

त्यांच्या या आरोपावरून एकच खळबळ माजली असताना आता राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाने या प्रकरणी थेट हायकोर्टात याचिका दाखल करण्याचा निर्णय घेतला आहे. एकट्या रणजित कासलेला या लोकांनी १० लाख रुपये दिले, तर इतर लोकांना किती दिले असतील? असा सवाल या प्रकरणी शरद पवार गटाचे परळीचे उमेदवार राजेसाहेब देशमुख यांनी उपस्थित केला आहे.

राजेसाहेब देशमुख म्हणाले की, रणजित कासले यांनी धनंजय मुंडेवर ईव्हीएमपासून दूर जाण्यासाठी १० लाख रुपये दिल्याचा आरोप केला आहे. यामुळे परळी मतदारसंघात प्रशासनाचा कशा पद्धतीने गैरवापर झाला हे स्पष्ट होते. या लोकांनी एकट्या कासलेला १० लाख रुपये दिले असतील, तर त्यांनी इतर लोकांना किती रुपये वाटले असतील याचा विचार न केलेला बरा. आता या सर्व प्रकरणाच्या चौकशीसाठी मी कोर्टात जाणार आहे.

# उभ्या ट्रकवर आदळली बस

## ४४ भाविक जखमी : ६ गंभीर







■ कैलास काळे, मलकापूर, दि. १८ :
शिर्डी, पंढरपुर आणि इतर देवस्थानासाठी जाणाऱ्या भाविकांच्या लक्झरी बसला अपघात होवून ४४भाविक जखमी झालेत. यातील ६ जण गंभीर आहेत. ही घटना नॅशनल हायवे क्रमांक ५३ वर काटी फाट्यानजीक घडली.


आंध्र प्रदेश राज्यातील कडप्पा व कर्नाळ जिल्ह्यातील ४४ भाविक काशी, अयोध्या, बुद्धगया, प्रयागराज वरुन नागपूर मार्गे नाशिककडे जात होते. दरम्यान, पाठीमागून भरधाव आलेल्या अज्ञात वाहनाने कट मारल्याने भाविकांची लक्झरी बस रस्त्यावर उभ्या ट्रकवर आदळली. ल्याने सदरचा अपघात घडला असल्याची माहिती बस चालक शब्बीर अहमद यांनी सदर प्रतिनिधीला दिली.

अपघाताची माहिती मिळताच मलकापूर ग्रामीणचे पो.नि. संदीप काळे, पो. कॉ राखोंडे, चालक भानुदास कऱ्हाळे, नांदुरा पो.स्टेचे कर्मचारी पोहोचले. ग्रामस्थांच्या मदतीने जखमींना बसमधून बाहेर काढून एसटी बसने मलकापूर येथील उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले उपजिल्हा रुग्णालय अधीक्षक डॉ. राजेश उंबरकर यांनी शहरातील खाजगी डॉ. मिलिंद पाटील, डॉ. अशोक नाफडे, डॉ. विपुल पाटील, डॉ. नितेश टावरी, डॉ.अमोल फिरके, डॉ. नीरज क्षिरसागर, मेडीकल ऑफिसर डॉ. सुविधा डिक्कर, अधिपरिचारीका किरण जाधव, सोनद राऊत, दिपाली लोहार, वैशाली जाधव, अटेंटड तस्लीम शेख, अब्दुल नबी यांना तातडीने पाचारण करण्यात आले. ७ जणांची प्रकृती गंभीर असल्याने त्यांना जिल्हा सामान्य रुग्णालय बुलढाणा येथे हलविले.

शिवसेना (उ.बा.ठा) शहरप्रमुख गजानन ठोसर, युवासेना तालुका प्रमुख पवन गरुड, दिपक घुस्सर, प्रमोद राखोंडे, रमेश गावंडे, सचिन बढे, शिवराज हुंबे, माजी सैनिक ज्ञानदेव इंगळे मदत कार्यासाठी धावून आले.

उपविभागीय महसूल अधिकारी संतोष शिंदे, तहसीलदार राहुल तायडे, शहर पो.नि गणेश गिरी, नायब तहसीलदार श्रीकृष्ण उगले, चारुशीला चौधरी यांनी हि उपजिल्हा रुग्णालयात जखमींची विचारपूस केली, नगराध्यक्ष अ‍ॅड हरीश रावळ, ओम शांती सेवा समितीचे सचिन भंसाली यांनी जखमींसाठी जेवणाची व्यवस्था केली. रात्री काही भाविकांना रेल्वेने गावी पाठविण्यात आले.

## युनेस्कोच्या मेमरी ऑफ द वर्ल्ड रजिस्टरमध्ये श्रीमद् भगवद्गीता-नाट्यशास्त्राचा समावेश


No. 424 of 1875-76 Cupboard : 23
Title : भगवद्गीता टीका
Author : राजानकराम Age :
Extent : foll. 581 lines letters
Remarks : शारदालिपी
Described : Vol. Part No.
Govt. Mss. Lib., Bhandarkar O. R. Institute, Pune (India)

■ वृत्तसंस्था
नवी दिल्ली, दि. १८ :
भारताच्या सांस्कृतिक आणि तात्विक वारशाला ऐतिहासिक मान्यता देत, श्रीमद् भगवद्गीता आणि भरत मुनींचे नाट्यशास्त्र यांचा युनेस्कोच्या मेमरी ऑफ द वर्ल्ड रजिस्टरमध्ये समावेश करण्यात आला आहे.

केंद्रीय मंत्री गजेंद्र सिंह शेखावत यांनी एक्सवर ही माहिती दिली. ते म्हणाले, हा जागतिक सन्मान भारताच्या शाश्वत ज्ञान आणि कलात्मक प्रतिभेचा उत्सव आहे. या कालातीत कलाकृती केवळ साहित्यिक खजिन्यापेक्षा जास्त आहेत. हे असे तात्विक पाया आहेत ज्यांनी आपण विचार करतो, अनुभवतो, जगतो आणि स्वतःला व्यक्त करतो त्या पद्धतीत सुधारणा केली आहे. १८ एप्रिल म्हणजेच जागतिक वारसा दिनी याचा समावेश करण्यात आला आहे.

पंतप्रधान मोदींनी नाताळच्या दिवशी ट्विट करून जगभरातील प्रत्येक भारतीयासाठी हा अभिमानाचा क्षण असल्याचे म्हटले आहे. ते म्हणाले- युनेस्कोच्या मेमरी ऑफ द वर्ल्ड रजिस्टरमध्ये गीता आणि नाट्यशास्त्राचा समावेश करणे ही आपल्या शाश्वत ज्ञानाची आणि समृद्ध संस्कृतीची जागतिक मान्यता आहे. गीता आणि नाट्यशास्त्राने शतकानुशतके संस्कृती आणि चेतनेचे पोषण केले आहे. त्यांचे अंतर्दृष्टी जगाला प्रेरणा देत राहतात.

युनेस्कोच्या मेमरी ऑफ द वर्ल्ड रजिस्टरमध्ये नाट्यशास्त्राचा समावेश करण्यात आला आहे. केंद्रीय मंत्री गजेंद्र सिंह शेखावत यांनी वर शेअर केले.

युनेस्कोच्या मेमरी ऑफ द वर्ल्ड रजिस्टरमध्ये नाट्यशास्त्राचा समावेश करण्यात आला आहे. केंद्रीय मंत्री गजेंद्र सिंह शेखावत यांनी वर शेअर केले.

मेमरी ऑफ द वर्ल्ड रजिस्टर १९९२ मध्ये सुरू झाले

यासह, आता आपल्या देशातील १४ नोंदी युनेस्कोच्या या रजिस्टरमध्ये समाविष्ट करण्यात आल्या आहेत. युनेस्कोचा मेमरी ऑफ द वर्ल्ड रजिस्टर हा १९९२ मध्ये युनेस्कोने सुरू केलेला एक आंतरराष्ट्रीय उपक्रम आहे.

ही एक आंतरराष्ट्रीय नोंदवही आहे ज्यामध्ये जगभरातील ऐतिहासिक, सांस्कृतिक किंवा सामाजिक महत्त्व असलेले ऐतिहासिक दस्तऐवज, हस्तलिखिते, दुर्मिळ पुस्तके, छायाचित्रे, चित्रपट, ऑडिओ रेकॉर्डिंग इत्यादींचा समावेश आहे.

## संग्राम थोपटे भाजपात जाणार?

### काँग्रेसला आणखी एक धक्का



■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. १८ :
काँग्रेसचे नेते संग्राम थोपटे लवकरच मोठा निर्णय घेण्याच्या तयारीत आहेत. ते काँग्रेस पक्षाचा राजीनामा देऊन लवकरच भाजपात प्रवेश करणार असल्याचे जवळपास निश्चित झाल्याचे म्हटले जात आहे. मिळालेल्या माहितीनुसार भाजपा प्रवेशासंदर्भात थोपटे यांची केंद्रीय गृहमंत्री अमिता शाहा यांच्यासोबत बैठक झाल्याचेही म्हटले जात आहे.

काँग्रेसचे नेते संग्राम थोपटे हे एकूण तीन वेळा भोर विधानसभा मतदारसंघाचे आमदार राहिलेले आहेत. या मतदारसंघात त्यांचे मोठे प्रस्थ आहे. गेल्या विधानसभा निवडणुकीत ते अजित पवार यांच्या राष्ट्रवादी पक्षाच्या उमेदवाराकडून पराभूत झाले. थोपटे यांनी भोरमध्ये त्यांच्या प्रमुख कार्यकर्त्यांची बैठक बोलावली आहे. याच बैठकीत कदाचीत त्यांच्या राजीनाम्याचा निर्णय होऊ शकतो. येत्या रविवारी ते काँग्रेस सदस्यत्व पदाचा राजीनामा देऊ शकतात.

रविवारी राजीनामा दिल्यानंतर ते लवकरच भाजपात प्रवेश करण्याची शक्यता आहे. येत्या २२ एप्रिल रोजी ते भाजपात प्रवेश करतील, असे सांगितले जात आहे. मुंबईत भाजपाच्या वरिष्ठ नेत्यांच्या उपस्थितीत हा पक्षप्रवेश सोहळा होईल, असेही सांगितले जात आहे.

**काँग्रेसला पुण्यात मोठा फटका बसणार?**

संग्राम थोपटे हे भाजपात जाणार असल्याची चर्चा चालू झाल्यानंतर आता काँग्रेसच्या गोटातही हाचलाची सुरू झाल्या आहेत. काँग्रेसचे पुण्याच्या जिल्हाध्यक्षांनी पुण्यातील काँग्रेस भवनात एक तातडीची बैठक बोलावली आहे. संग्राम थोपटे यांनी भाजपात प्रवेश केला तर काँग्रेसचे पुण्यात मोठे राजकीय नुकसान होऊ शकते. कारण संग्राम थोपटे यांचे वडील जवळपास सहा वेळा काँग्रेसच्या तिकिटावर आमदार राहिलेले आहेत. संग्राम थोपटे हेदेखील तीन वेळा आमदार राहिले.

## देख लेंगे राज ठाकरे में कितना है दम..
### गुणरत्न सदावर्तेंनी काढला चिमटा



■ **मुंबई :** वकील गुणरत्न सदावर्ते यांनी हिंदीच्या सक्तीला विरोध करणाऱ्या मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांना पुन्हा एकदा डिवचले आहे. लहान वयात मुलांना ज्ञान मिळवण्याची संधी मिळत असेल तर तुम्ही त्याला विरोध का करता? नेत्यांची लेकरे इंग्रजी शाळेत शिकणार आणि सामान्यांच्या लेकरांनी काय स्थानिक शाळेतच शिकायचे का? राज ठाकरे यांनी सरकारच्या चांगल्या निर्णयाला विरोध करू नये, असे त्यांनी म्हटले आहे. राज ठाकरे या आंदोलनातूनही एक दिवस माघार घेतील, असा टोलाही त्यांनी उपरोधिकपणे राज यांना हाणला आहे.

राज्य सरकारने महाराष्ट्रात इयत्ता पहिलीपासून हिंदी भाषेची सक्ती करण्याचा निर्णय घेतला आहे. राज ठाकरे यांनी या निर्णयाला विरोध करण्यासाठी सर्वच राजकीय पक्षांना एकत्र येण्याचे आवाहन केले आहे. या पार्श्वभूमीवर गुणरत्न सदावर्ते यांनी त्यांच्यावर निशाणा साधला आहे. ते म्हणाले की, राज्य सरकारने एक चांगला निर्णय घेतला. शालेय विद्यार्थ्यांना हिंदी भाषा उपलब्ध करून दिल्याविषयी मी त्यांचे आभार मनातो. हा विद्यार्थी हिताचा निर्णय आहे. पण राज ठाकरे यांनी त्याला विरोध केला. मी त्यांच्या भूमिकेचा निषेध करतो. त्यांच्या धमक्यांना आम्ही संविधानाने उत्तर देऊ.

ते पुढे म्हणाले, राज ठाकरे यांच्या मनसेसारखे अनेक पक्ष नोंदणीकृत आहेत. ते गल्लीबोळात दिसून येतात. पण याचा अर्थ असा नाही की, तुम्ही मुलांच्या प्रगतीत अडथळा निर्माण कराल. नव्या धोरणांतर्गत वयाच्या १५ वर्षापर्यंत मुलांना अधिकाधिक भाषा शिकता येतील. त्याला तुम्ही का विरोध करत आहात. राज यांच्या उग्र विचारांचा आम्ही निषेध करतो. राज यांना आम्ही संविधानाने रोखू. या निर्णयाच्या अंमलबजावणीच्या आड आम्ही कुणालाही येऊ देणार नाही. मी त्यांच्या कार्यकर्त्यांना सांगत आहे की, या स्टाईलने, त्या स्टाईलने काहीही चालणार नाही. इथे तालिबानी वृत्ती खपवून आघेतली जाणार नाही. देश अखंड ठेवण्यासाठी आम्ही हिंदी भाषेचे मनापासून स्वागत करतो.

## मराठीसाठी टोकाला जाईपर्यंत संघर्ष
### संदीप देशपांडे यांचा इशारा



■ **मुंबई :** हिंदी भाषा अनिवार्य केली त्याबद्दल आमची आता जी भूमिका आहे तीच ठाम राहणार आहे. आम्ही सरकारला काल अल्टिमेटम दिला आहे, आता निर्णय सरकारने करायचा आहे, येणाऱ्या दिवसामध्ये तुम्हाला पुढचे पाऊल दिसेल, संघर्ष होईल आणि तोही टोकाला जाईपर्यंत संघर्ष होईल, असे मनसेचे मुंबई शहराध्यक्ष संदीप देशपांडे म्हणाले.

आज हिंदी भाषा सक्तीची करत आहात. उद्या बोलाल गुजराती भाषा शिका, परवा बोलाल तामिळ शिका, असं होत नाही, आम्ही आमच्या राज्याची भाषा शिकू. दुसऱ्या राज्याची भाषा आम्ही का शिकायची? हे बंधनकारक करण्याला आमचा विरोध आहे.हिंदी आनिवार्य करण्याच्या मुद्यावर काही मराठी भैय्ये बोलले आहेत. ते मराठीवर बोलले की भैय्यावर हे काही कळले नाही, असा टोला त्यांनी हिंदी आनिवार्य करण्याच्या समर्थनार्थ असलेल्या नेत्यांना लगावला आहे.

संदीप देशपांडे म्हणाले की, मैत्री हा एक भाग झाला आणि मराठीची अस्मिता हा एक भाग झाला. तुम्ही आमच्यावर हिंदी लादू शकत नाही. ही आमच्या पक्षाची ठाम भूमिका आहे. त्यांच्या पक्षाची भूमिका त्यांनी घ्यावी. मराठी भैय्यांनी ठरवायचे आहे की मराठी व्हायचे आहे की भैय्या व्हायचे आहे.

## उबाठा पक्ष बाळासाहेबांच्या विचारांपासून दूर



■ **मुंबई :** शिवसेना उपनेते आणि प्रवक्ते संजय निरुपम यांनी उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेना (उबाठा) पक्षावर जोरदार टीका केली. बाळासाहेब ठाकरेंच्या विचारांपासून दूर गेलेला आणि सत्तेसाठी हिंदुत्व सोडणारा उबाठा पक्ष कृत्रिम झाल्याचा आरोप निरुपम यांनी केला.

निरुपम म्हणाले, उबाठा गटाने कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करून बाळासाहेबांचे भाषण दाखवले, पण खरेतर हा गटच कृत्रिम झाला आहे. सत्तेसाठी त्यांनी बाळासाहेबांचे हिंदुत्व आणि विचार सोडले. काँग्रेससोबत कधीही जाणार नाही, गेलो तर शिवसेनेचे दुकान बंद करेन, असे बाळासाहेब म्हणाले होते. मात्र, उबाठाने खुर्चीसाठी काँग्रेसशी हातमिळवणी करून शिवसेना काँग्रेसच्या दावणीला बांधली, वक्फ बोर्ड सुधारणा विधेयकाला विरोध करणारा उबाठा गट पश्चिम बंगालमध्ये हिंदूंवर अत्याचार करणाऱ्या ममता बॅनर्जी यांच्यासोबत असल्याचा आरोपही निरुपम यांनी केला.

## स्वराज्य संस्था निवडणुकीत 'एकला चलो रे'!



■ **पुणे :** राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका खोळंबल्या आहेत. यावर्षी दिवाळी नंतर निवडणुका होण्याची शक्यता आहे. या निवडणुका प्रत्येक राजकीय पक्ष त्यांच्या राजकीय शक्तीनूसार स्वबळावर लढवण्याच निर्णय घेईल,असा दावा इंडिया अगेन्स्ट करप्शनचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि ओबीसी नेते हेमंत पाटील यांनी केला.

महायुतीतील शिवसेनेने (शिंदे गट) यांनी काही निवडक शहरे सोडली तर इतर ठिकाणी युती होणार नाही हे जाहीर करून टाकत भाजप, राष्ट्रवादीवर दबाव आणण्याचा प्रयत्न केलाय. मुंबई, ठाणे वगळता इतर ठिकाणी युती नकोय,असे पक्षाचे नेते बोलत आहेत.परंतू,शिंदे गटाचा फार फायदा भाजपला होईल, याची शक्यता नाही. अशात मुंबई, ठाणे काय तर इतर ठिकाणी शिंदेची सेना भाजपसोबत नसली तरी भाजपला नुकसान होणार नाही, असा दावा पाटील यांनी केला.

### देशात आणि जगात संपर्कासाठी हिंदी, इंग्रजी गरजेची
# अजित पवारांनी केले हिंदीचे समर्थन

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १८ :**
महाराष्ट्रात राहायचे असेल तर त्याला मराठी आलेच पाहिजे. त्याच बरोबर देशातील अनेक राज्यांमध्ये हिंदी पण चालते काही जण म्हणतात ही राष्ट्रभाषा आहे, पण त्यावर वाद आहे, मला त्या वादात पडायचे नाही, ज्यांना काही उद्योग नाही ते असे वाद घालतात, असे म्हणत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी राज ठाकरेंचे नाव न घेता त्यांना टोला लगावला आहे.

अजित पवार पुढे बोलताना म्हणाले की, इंग्रजी ही जगात बहुतेक देशांमध्ये चालते. त्यामुळे ही देखील भाषा आली पाहिजे. पण आपली मातृभाषा असलेल्या मराठीला पहिले स्थान आहे.



आज समोरच्या राजकीय पक्षांना काही राजकीय मुद्दा राहिलेला नाही. उन्हाची तीव्रता, उष्माघात असे अनेक मुद्दे आहेत. जागतिक पातळीवर १०३ टक्के पाऊस पडणार अशी शक्यता वर्तवली आहे. आता हा पाऊस पडला पाहिजे ही पांडुरंगा चरणी प्रार्थना आहे.

अजित पवार म्हणाले की, नाशिक दगडफेक प्रकरणी जे कोणी दोषी असतील त्यांच्यावर गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत. आम्ही काही पक्ष म्हणून त्यांच्यावर गुन्हे दाखल केलेले नाही.

जो दोषी आहे त्यांच्यावर कारवाई करण्यात येणार ते कोणत्या पक्षाचे आहे हे पोलिस पाहणार नाही. कुणीही जर कायदा व्यवस्थेचा प्रश्न निर्माण करत असेल तर त्याची गय केली जाणार नाही, असे त्यांनी स्पष्ट केले.

**निलंबिताच्या आरोपांना किती महत्त्व देणार?**

अजित पवार म्हणाले की, बीड संतोष देशमुख हत्या प्रकरणी अनेक चौकशी सुरू आहेत. या सगळ्या चौकशीचा अहवाल आल्यानंतर मंत्रिपदाबद्दल राज्याचे मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्री निर्णय घेतील. निलंबित अधिकाऱ्याच्या आरोपांना किती महत्त्व द्यायचे हे कुठेतरी विचार जनतेसह मिडीयाने केला पाहिजे. महिला वकीलाला जी मारहाण करण्यात आली त्या संदर्भात कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत. यासाठी कोण जबाबदार आहे, त्याला पाठिशी घालणार नसल्याचे ते म्हणाले.

## शिंदेंना प्रत्युत्तर देण्यासाठी आदित्य ठाकरे सरसावले

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १८ :**



शिवसेना पक्षाची दोन शकले झाल्यापासूनच शिंदे विरुद्ध ठाकरे असा संघर्ष पाहायला मिळत आहे. एकनाथ शिंदे यांच्यावर शाब्दिक हल्ला करण्याची एकही संधी ठाकरे गट सोडत नाही. मुंबईतील पाण्याच्या समस्येबाबतही आता आदित्य ठाकरे यांनी राज्यकर्त्यांना दोषी ठरवले आहे. इतकेच नाही तर सरकारने धरण बांधण्यासाठी पाच लाख झाडे तोडण्याचा निर्णय घेतला असून त्यालाही त्यांनी विरोधी दर्शवला आहे.

आदित्य ठाकरे म्हणाले की, मुंबईत पाण्याची समस्या ही एक मोठी समस्या आहे. भाजपने हा प्रश्न सोडवलेला नाही आणि मुख्यमंत्र्यांनीही हा प्रश्न सोडवलेला नाही. आम्ही याबद्दल निषेध केला, पण पोलिसांनी आमच्या पक्षाच्या कार्यकर्त्यांना अटक करून ताब्यात घेतले. कालच्या बैठकीत सरकारने धरण बांधण्यासाठी पाच लाख झाडे तोडण्याचा निर्णय घेतला आहे. ते हवामानाला गांभीर्याने घेत नाहीत. आम्ही विकासाच्या विरोधात नाही, पण हवामानाचे रक्षण करावे लागणार असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

## मराठी अस्मिता नष्ट करण्याचा भाजपाचा डाव : सपकाळ

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १८ :**



मराठी भाषा, अस्मिता आणि संस्कृती नष्ट करण्याचा भारतीय जनता पक्षाचा (भाजपा) कुटील डाव असून, हिंदी भाषेच्या सक्तीचा निर्णय तात्काळ रद्द करावा, अशी मागणी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केली. टिळक भवन येथे पत्रकार परिषदेत ते बोलत होते. सपकाळ यांनी अंबाजोगाई येथील वकील तरुणीवर झालेल्या अमानुष मारहाण प्रकरणी तात्काळ गुन्हा दाखल करून आरोपींना अटक करण्याची मागणीही केली.

सपकाळ म्हणाले, मराठी ही महाराष्ट्राची ओळख आणि संस्कृती आहे. मात्र, भाजपा सरकार पहिलीपासून हिंदी सक्ती करून विविधतेत एकता असलेली भारतीय ओळख पुसण्याचा प्रयत्न करत आहे. मराठीला अभिजात दर्जा देण्याचे बोलणे आणि बोलीपासून दूर ठेवणे, हा दुटप्पीपणा आहे. तीन भाषांच्या सक्तीमुळे विद्यार्थी मूलभूत ज्ञानापासून वंचित राहतील आणि इतर भाषांच्या शिक्षकांच्या नोकऱ्यांवर गदा येईल. हिंदू, हिंदी आणि हिंदूराष्ट्र लादणे, हा भाजपाचा अजेंडा आहे. दक्षिण भारतात हिंदीला विरोध असताना महाराष्ट्रात सक्ती का? मराठी बोलणारे हिंदू नाहीत का? छत्रपती शिवाजी महाराजांच्या हिंदवी स्वराज्याची भाषा नष्ट करण्याचा हा डाव आहे, असा घणाघाती हल्ला सपकाळ यांनी चढवला.

बीडमधील अत्याचारांवरही सपकाळ यांनी सरकारवर ताशेरे ओढले. सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येनंतर आता अंबाजोगाईत वकील तरुणीवर सरपंच आणि त्याच्या कार्यकर्त्यांनी ध्वनी प्रदूषणाच्या तक्रारीवरून क्रूर हल्ला केला. लाठ्या, लोखंडी पाइपने मारहाण करून ती बेशुद्ध झाली, तरी रुग्णालयातून एका रात्रीत घरी पाठवण्यात आले. वकील महिलेला संरक्षण नसेल, तर सामान्य महिलांचे काय? सरकारने आरोपींना कठोर शिक्षा द्यावी, अशी मागणी सपकाळ यांनी केली.

## राजच्या पोस्टची स्क्रिप्ट सागर बंगल्यावर
### मोदी-शहांना इंग्रजी येत नसल्याने हिंदीची सक्ती

■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. १८ :**



राज्यात हिंदी भाषा सक्तीची करण्याच्या मुद्यावर उद्धव ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी भाजपवर निशाणा साधला आहे. हा निर्णय समोर येतात राज ठाकरे यांनीही मोठी पोस्ट केली होती. यावर देखील संजय राऊत यांनी टीका केली.

इतक्या लवकर इतकी मोठी पोस्ट कशी केली गेली? असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला आहे. त्यामुळे राज ठाकरेंच्या पोस्टची स्क्रिप्ट सागर बंगल्यावर लिहिली गेली असल्याचा आरोपही संजय राऊत यांनी केला आहे.

हिंदी भाषा विषयी मनसे प्रमुख राज ठाकरेंनी मोठे ट्विट केले होते. एवढ्या कमी वेळात ते कसे केले? असा प्रश्न राऊत यांनी उपस्थित केला. त्या ट्विटची स्क्रिप्ट ही सागर बंगल्यावर लिहिली गेली असल्याचा आरोप देखील संजय राऊत यांनी केला आहे. महाराष्ट्राच्या निर्मितीत भाजपचे कोणतेही योगदान नसल्याचा आरोप संजय राऊत यांनी केला आहे. आधी नोकरी, उद्योग, व्यवसाय यादी ठिकाणी मराठी भाषेचा सन्मान राहिला पाहिजे. तेथे आधी मराठी सक्तीची करा, असे देखील संजय राऊत यांनी म्हटले आहे.

मोदी आणि अमित शहा यांना इंग्रजी येत नाही. त्यामुळे हिंदीची सक्ती करण्यात येत असल्याचा आरोप संजय राऊत यांनी केला आहे. आधी इंटरनॅशनल शाळांमध्ये मराठी सत्तेची करा, त्याची हिंमत आहे का? असा प्रति प्रश्न देखील त्यांनी उपस्थित केला.

हिंदी ही आमच्यावर लालू नका, असे देखील संजय राऊत यांनी म्हटले आहे. मुंबईला हिंदी शिकवण्याची किंवा हिंदी लादण्याची गरजच नाही. ज्या शहरात जगातला उत्कृष्ट हिंदी सिनेमा तयार होतो. तेथे हिंदी सक्ती करण्याची गरज नाही, असे देखील संजय राऊत यांनी म्हटले आहे. अजूनही राज्यात अनेक ठिकाणी मराठी भाषा सक्तीची झाली नसल्याचे संजय राऊत यांनी म्हटले आहे.

मुख्यमंत्र्यांनी आधी माय मराठी कडे लक्ष दिले पाहिजे, असे आवाहन देखील संजय राऊत यांनी केले आहे. महाराष्ट्राच्या निर्मितीत भाजपचे कोणताही योगदान नाही, असे देखील संजय राऊत यांनी म्हटले आहे. त्यामुळे आमच्यावर हिंदी लादू नका, सक्ती करू नका, असा इशारा देखील त्यांनी दिला आहे. हिंदी ही देशातील संवादात्मक भाषा आहे. तिला आमचा विरोध नाही. मात्र, ती न लादण्याचा सल्ला त्यांनी दिला आहे.

## रणजित कासलेला अटक
### कराडच्या एन्काउंटरचा केला होता दावा

■ **वृत्तसंस्था, पुणे, दि. १८ :**



निलंबित झालेला पोलिस उपनिरीक्षक रणजित कासले शरण आला नसतानाच त्याला पुण्यातील एका हॉटेलमधून अटक करण्यात आली आहे.

निलंबनानंतर त्याने सोशल मीडियावर व्हिडिओ टाकून थेट मुख्यमंत्री आणि एसपींवर आरोप केले होते. वाल्मीक कराडच्या एन्काऊंटरसाठी आपल्याला ५० कोटींची ऑफर मिळाल्याचा दावाही त्याने केला होता. त्यानंतर आपण शरण जाणार असल्याचेही त्याने म्हटले होते. मात्र, तो शरण आला नव्हता. अखेर कासले याला स्वारगेटच्या हॉटेलमधून अटक करण्यात आली आहे. दरम्यान पोलिस महानिरीक्षकांनी कासले याला बडतर्फ करत कारवाई देखील केली आहे.

कासले बीडच्या सायबर पोलिस ठाण्यात कार्यरत होता. एका गुन्ह्यात वरिष्ठांची परवानगी न घेता गुजरातमध्ये जाऊन आर्थिक तडजोड केल्यामुळे त्याला निलंबित केले होते. त्याने सोशल मीडियावर व्हिडिओ टाकून थेट मुख्यमंत्री आणि एसपींवर आरोप केले होते. वाल्मीक कराडच्या एन्काऊंटरसाठी ५० कोटींची ऑफर मिळाल्याचा दावाही त्याने केला होता.

## तनिषा भिसे मृत्यू प्रकरणात डॉ. घैसास निर्दोष
### ससून रुग्णालयाच्या अहवालात इतर ३ रुग्णालय दोषी

■ **वृत्तसंस्था, पुणे, दि. १८ :**
ईश्वरी उर्फ तनिषा भिसे मृत्यू प्रकरणात वेगवेगळे चार चौकशी अहवाल पोलिसांना आतापर्यंत प्राप्त झाले आहे. राज्य सरकारने नेमलेल्या आरोग्य विभागाच्या चौकशी समितीकडून दीनानाथ मंगेशकर रुग्णालय तसेच भिसे यांच्यावर उपचार करणाऱ्या डॉक्टर सुश्रुत घैसास यांच्यावर देखील दोषी असल्याचा ठपका ठेवण्यात आला आहे.

मात्र, ससून रुग्णालयाने केलेल्या चौकशीमध्ये दीनानाथ मंगेशकर रुग्णालय तसेच डॉक्टर सुश्रुत घैसास यांचा याप्रकरणात कोणताही दोष नसल्याचा सहा पानी अहवाल पुणे पोलिसांना सादर केला आहे.

ससून रुग्णालयाने दीनानाथ मंगेशकर रुग्णालय आणि डॉक्टर घैसास यांना वाचवण्याचा प्रयत्न करत याप्रकरणी इंदिरा आईव्हीएफ ,सूर्या हॉस्पिटल आणि मनीपाल हॉस्पिटल यांच्या विरोधात दोषी असल्याचा निष्कर्ष काढला आहे अशी माहिती सूत्रांनी दिली आहे.

मणिपाल हॉस्पिटल यांनी भिसे यांच्या मृत्यूनंतर शवविच्छेदन करण्यात आले नसल्याचे सांगितले आहे. त्यामुळे संबंधित अहवाल हा सुस्पष्ट नसल्याने याबाबत गुन्हा दाखल करावा की नाही अशी समस्या पुणे पोलिसांना पडलेली आहे. या प्रकरणात दिनानाथ मंगेशकर रुग्णालय आणि डॉक्टर घैसास हे दोषी असून त्यांच्यावर योग्य ती कारवाई करण्यात येईल अशी भूमिका आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर यांनी मांडली आहे . मात्र, डॉक्टर घैसास किंवा दीनानाथ मंगेशकर रुग्णालयावर गुन्हा दाखल करण्यास पुणे पोलिसांची टाळाटाळ सुरू आहे.

## वधूची प्रियकराला मिठी : वराची आत्महत्या

■ **वृत्तसंस्था, नाशिक, दि. १८ :**
वाराणसी येथे नियोजीत साखरपुड्यात नवरीने तिच्या प्रियकराला मिठी मारल्याने वैफल्यग्रस्त झालेल्या इन्कमटॅक्स अधिकारी असलेल्या नवरदेवाने गळफास लावून घेत आत्महत्या केली.

याप्रकरणी नवरीसह तीचा प्रियकर आणि अन्य एका संशयिताविरोधात अंबड पोलिस ठाण्यात आत्महत्येस प्रावृत्त केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला. उत्तमनगर येथील, इन्कमटॅक्स कॉलनीत हा प्रकार उघडकीस आला.

पोलिसांनी दिलेली माहिती आणि हरेराम पाण्डेय रा. देवरीया, उत्तर प्रदेश यांच्या तक्रारीनुसार, त्यांचा भाऊ हरेकृष्ण पाण्डेय याचा वारणसी येथील मोहिनी नामक युवतीसोबत साखरपुडा झाला होता. या कार्यक्रमात मोहिनीचा प्रियकर सुरेश पाण्डेय याने मिठी मारली होती. त्यानंतर होणाऱ्या पत्नीचे प्रेमसंबध उघड झाल्याने हरेकृष्ण वैफल्यग्रस्त होते. मोहिनीला फोन करुन प्रियकराला अजुनही सोडून दिले तर मी लग्न करेल असे त्यांनी सांगितले. मात्र तिने प्रियकराला सोडण्यास नकार देत उलट तु जर माझ्या सोबत लग्न केले नाही तर तुझ्यासह कुटुंबियांवर हुंडा मागितल्याची तक्रार दाखल करुन तुम्हाला रस्त्यावर आणेल, अशी धमकी देत तीने मानसिक छळ केला. तीचे प्रेमसंबध आणि धमकी यामुळे हरेकृष्ण वैफल्यग्रस्त झाला होता. त्यातून त्याने उत्तमनगर येथे गळफास घेत आत्महत्या केली.

**आजच होता विवाह**

वाराणसी येथे हरेकृष्ण पांण्डेय यांचा शुक्रवार दि. १८ विवाह होणार होता. मात्र लग्न होण्यापूर्वीच त्यांनी आत्महत्या केल्याने इनकमटॅक्स विभागात हळहळ व्यक्त होत आहे. हरेकृष्ण लोकसेवा आयोगाचीही परिक्षा देत होता.

## स्वारगेट रेप प्रकरणातील आरोपीला पॉर्नची चटक
### पोलिसांचा समरी अहवाल समोर; २० हून अधिक मुद्यांद्वारे आरोपीचा खोटेपणा उघड

■ **वृत्तसंस्था, पुणे, दि. १८ :**
पुण्यातील स्वारगेट बस स्थानकावरील शिवशाही बसमध्ये झालेल्या बलात्कार प्रकरणाप्रकरणी पोलिसांचा समरी अहवाल समोर आला आहे. त्यात पोलिसांनी विविध मुद्यांच्या आधारावर आरोपीचा खोटारडेपणा स्पष्ट केला आहे. आरोपी दत्ता गाडे याने आपण लैंगिक अत्याचारासाठी सक्षम नसल्याचा दावा खोटा असल्याचेही या अहवालातून स्पष्ट झाले आहे हे विशेष.

गत फेब्रुवारी महिन्यात पुण्याच्या वर्दळीच्या स्वारगेट बस स्थानकावर एका तरुणीवर बलात्कार झाला होता. ही घटना बसस्थानकावर उभ्या असणाऱ्या एका शिवशाही बसमध्ये घडली होती. तिचे राज्यभर तीव्र पडसाद उमटले होते. पोलिसांनी या प्रकरणी दत्ता गाडे नामक आरोपीला त्याच्या गावातून अटक केली होती. त्यानंतर त्याने या प्रकरणाचा तपास भरकटवण्यासाठी वेगवेगळे दावे केले होते. त्यात त्याने आपण लैंगिक संबंधांसाठी सक्षम नसल्याचाही दावा केला होता. पण आता पोलिसांच्या समरी अहवालातून त्याचा खोटेपणा उघड झाला आहे. एका न्युज चॅनलने आपल्या वृत्तात तसा दावा केला आहे.

## भाजपाची दीड कोटी सदस्य नोंदणी

■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. १८ :**
भारतीय जनता पार्टीच्या (भाजपा) संघटन पर्वातंर्गत महाराष्ट्रात दीड कोटी प्राथमिक आणि १ लाख ३४ हजार सक्रिय सदस्य नोंदणीचे उद्दिष्ट साध्य करून इतिहास रचला आहे. भाजपा राष्ट्रीय सरचिटणीस खा. अरुण सिंह यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे आणि प्रदेश कार्यकारी अध्यक्ष रविंद्र चव्हाण यांच्या नेतृत्वाखालील यशस्वी अभियानाबद्दल कार्यकर्त्यांचे अभिनंदन केले.

भाजपा प्रदेश कार्यालयातील पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी प्रदेश सरचिटणीस विक्रांत पाटील, माधवी नाईक, राजेश पांडे, रवींद्र अनासपुरे, नवनाथ बन आणि ओमप्रकाश चौहान उपस्थित होते.

खा. सिंह म्हणाले, पक्षाच्या ७० टक्के बूथ समित्यांचे गठन झाले असून, २२ एप्रिलपर्यंत १ लाख बूथ समित्या स्थापन करण्याचे उद्दिष्ट आहे. यामुळे १२ लाख सक्रिय कार्यकर्त्यांची फौज पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री फडणवीस यांच्या नेतृत्वात विकसित भारत आणि महाराष्ट्रासाठी कार्य करेल. पक्षात अंतर्गत लोकशाही आणि सामूहिक निर्णय प्रक्रिया आहे, असेही त्यांनी नमूद केले.

रविंद्र चव्हाण यांनी सांगितले की, जानेवारी २०२५ पासून घरोघरी जाऊन दीड कोटी प्राथमिक सदस्य नोंदणीचे लक्ष्य पूर्ण झाले. १ लाख ४० हजार सक्रिय सदस्य झाले असून, ३ लाख सक्रिय सदस्यांचे उद्दिष्ट आहे. २० एप्रिलला ११९६ मंडल अध्यक्षांच्या निवडणुका होणार असून, २२ एप्रिलपासून जिल्हाध्यक्ष निवडीची प्रक्रिया सुरू होईल.

खा. सिंह यांनी काँग्रेसच्या माजी अध्यक्षा सोनिया गांधी यांचे जावई रॉबर्ट वाड्रा यांच्या संशयास्पद जमीन व्यवहारावरही भाष्य केले. वाड्रा यांनी एका कंपनीकडून ७ कोटींना जमीन खरेदी करून चार महिन्यांत तीच जमीन ५८ कोटींना विकली. ह्एवढा नफा देणाऱ्या व्यवहाराची चौकशी होणारच, असे सिंह यांनी ठणकावले.

## महिलांच्या ३३ टक्के आरक्षणाची अंमलबजावणी

मुंबई भाजपमध्ये आता महिलांच्या ३३ टक्के आरक्षणाची अंमलबजावणी करण्यात येणार आहे. त्यानुसार आता ३३ टक्के मंडल अध्यक्ष पदावर महिलांना संधी मिळणार आहे. २०२९ च्या विधानसभा निवडणुकीसाठी भाजपची पूर्वतयारी म्हणून या निर्णयाकडे पाहिले जात आहे. मुंबईत प्रत्येक विधानसभेत ३ मंडल अध्यक्ष नेमले जाणार आहेत.

भारतीय जनता पक्ष हा कायमच निवडणुकीच्या मोड मध्ये असतो, असे म्हटले जाते. त्याचा प्रत्यय आता पुन्हा एकदा आला आहे. मुंबईत होणाऱ्या महानगरपालिका निवडणुकीच्या दृष्टिकोनातून मुंबई भाजपची बैठक झाली. या बैठकीमध्ये आता २०२९ मध्ये होणाऱ्या विधानसभा आणि लोकसभा निवडणुकीची तयारी करण्यात आली आहे. या निवडणुकीत महिलांना ३३ टक्के आरक्षण लागू होणार आहे. त्यामुळे त्या आधीच भाजपने आपल्या मंडल अध्यक्ष पदांवर महिलांना ३३ टक्के आरक्षण देण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयाचा भाजपला काय फायदा होतो? हे पाहावे लागेल.

## पितांबरीचे डॉ. रवींद्र प्रभुदेसाई यांचा ठाण्यात भव्य नागरी सत्कार

■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. १८ :**
अल्प कालावधीत उद्योगक्षेत्रात भरीव कामगिरी करणारे, शेकडो मराठी युवकांना रोजगार उपलब्ध करून देणारे आणि उद्योगक्षेत्रात पाऊल टाकण्यासाठी मराठी युवकांना प्रोत्साहित करणारे ह्यपितांबरीह्नचे व्यवस्थापकीय संचालक रवींद्र प्रभुदेसाई यांना टिळक महाराष्ट्र विद्यापीठाने डी.लिट. (विद्यानिधी) ही मानाची पदवी प्रदान केल्याबद्दल ठाण्यात त्यांचा जाहीर नागरी सत्कार करण्यात आला.

ज्येष्ठ अणुशास्त्रज्ञ पद्मविभूषण डॉ. अनिल काकोडकर, सुप्रसिद्ध व्याख्याते डॉ. सच्चिदानंद शेवडे, चितळे बंधूचे प्रमुख श्रीकृष्ण चितळे, भाजपचे आमदार संजय केळकर, आमदार निरंजन डावखरे उपस्थित होते. डॉ. काशिनाथ घाणेकर नाट्यगृहात नागरी अभिवादन सत्कार समितीने या सोहळ्याचे आयोजन केले होते.




या वेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी डॉ. रवींद्र प्रभुदेसाई यांना डॉक्टरेट प्राप्त झाल्याविषयी पाठवलेल्या संदेशाचे वाचन करण्यात आले. डॉ. रवींद्र प्रभुदेसाई यांच्या वाटचालाची सविस्तर माहिती असलेल्या स्मरणिकेचे या वेळी मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले.

सत्कारापूर्वी डॉ. रवींद्र प्रभुदेसाई आणि त्यांची पत्नी सौ. वृषाली यांच्यावर सुवासिनींनी पुष्पवृष्टी केली. वरिष्ठ पत्रकार सुधीर जोगळेकर यांनी मानपत्राचे शब्दांकन केले. सौ. अरूंधती भालेराव यांनी मानपत्राचे वाचन केले.

या वेळी पितांबरी उद्योगसमूहाच्या वार्षिक दैनंदिनीचेही प्रकाशन करण्यात आले. नागरी सत्काराला उतार देताना प्रभुदेसाई म्हणाले की, गुरुकृपायोगानुसार साधना केल्यामुळे माझ्या जीवनात अनेक पालट झाले. सनातन संस्थेच्या मार्गदर्शनानुसार केलेली साधना ही पितांबरीच्या व्यावसायिक वृद्धीसाठी साहाय्यभूत ठरली. डॉ. जयंत आठवले यांच्या मार्गदर्शनानुसार कुडाळ, मालवण, रत्नागिरी येथील उद्योजकांना उद्योगक्षेत्रातील साधनेच्या महत्त्वाविषयी मार्गदर्शन घेतले. मला प्राप्त झालेली डॉक्टरेट पदवी ही मी सनातन संस्था आणि मला सहकार्य करणाऱ्या संस्थांना अर्पण केली आहे. सोहळ्याची सांगता पसायदानाने करण्यात आली. सोहळ्यानंतर अनेकांनी डॉ. रवींद्र प्रभुदेसाई यांचा सत्कार केला.

# ती जखमी महिला गर्भवतीचं नाही

## अचलपूर येथील डॉक्टरांनी केले स्पष्ट | डोमा येथील मारहाण प्रकरणाला कलाटणी

**महासागर प्रतिनिधी**

**चुरणी/ अमरावती, (दि.18)** - चिखलदरा तालुक्यातील डोमा येथे गर्भवती महिलेला शेजारी राहत असलेल्या तिच्याच नातेवाईकांनी बेदम मारहाण केल्याने तीचा गर्भपात झाल्याची धक्कादायक घटना गुरुवारी(दि.17) रात्री उशिरा उघडकीस आली होती. या घटनेची चिखलदरा पोलिसांनी गंभीर दखल घेत आरोपींविरुध्द विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला होता. या महिलेला अधिक उपचाराकरिता अचलपूर कुटीर रुग्णालयात दाखल करण्यात आले. यावेळी डॉक्टरांनी सोनोग्राफी केल्यावर सदर महिला ही गर्भवतीचं नसल्याचे स्पष्ट झाले. यामूळे प्रकरणाला तर कलाटणी मिळालीच सोबतच पोलिसांचीही दिशाभूल झाल्याचे पुढे आले.



राणी अजय अथोटे असे त्या कथित गर्भवती महिलेचे नाव आहे. या महिलेच्या घरा शेजारी राहणाऱ्या अमित अथोटे व त्याच्या पत्नीशी शौचालयाच्या पाण्यावरुन वाद झाला. हा वाद इतका वाढला की, अमित अथोट ने काही नातेवाईकांना बोलावून, अजय अथोटे व तिच्या पत्नीला बेदम मारहाण करण्यात आली. अजय च्या डोक्यावर विटा व लाठी ने मारल्याने तोसुध्दा गंभीर जखमी झाला. या मारहाणीमध्ये राणीचे दोन दात सुद्धा पडले आहे. दोन्ही जखमींना शासकीय ग्रामीण रुग्णालय चूरणी येथे उपचाराकरिता आणण्यात आले. प्रथम दर्शनी अजय ची पत्नी राणी हिचा गर्भपात झाल्याने तिची प्रकृती चिंताजनक असल्याचे पुढे आले होते. मात्र अचलपूर उपजिल्हा रुग्णालयात हलविण्यात आले. येथे उपचारादरम्यान तिची सोनोग्राफी केल्यावर ती गर्भवती नसल्याने तेथील डॉक्टरांनी सांगितले. पोलिसांनी प्राथमिक अहवालावरुन आरोपींविरुध्द कलम 177 (2), 118(1), 115(2), 352, 351(2) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करुन घटनास्थळावरून अमित जगलाल अथोटे, संध्या अमित अथोटे, खुशी अमित अथोटे, चिकू अमित अथोटे यांना ताब्यात घेतले.

> आम्ही जखमी राणी अथोटे या महिलेची सोनोग्राफी केल्यावर ती गर्भवती नसल्याचे निदर्शनास आले, त्यामूळे तिचा गर्भपात होण्याचा प्रश्नच उद्भवत नाही.
>
> **डॉ.विजय सिरसामकर, (उपजिल्हा रुग्णालय, अचलपूर)**

# बडनेरा ते नाशिक मेमू ट्रेनच्या वेळेत बदल

## रेल्वे प्रशासनाद्वारे काढले परिपत्रक

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,(दि. 18)** बडनेरा व नाशिक रोड मेमू ट्रेनची वेळ बदलून ती प्रवाशांच्या सोयीची करण्यात आली आहे. यासाठी माजी खासदार नवनीत राणा यांनी पाठपुरावा केल्यामुळे प्रवाशांनी त्यांचे आभार मानले आहेत. अमरावती रेल्वे स्टेशन तसेच बडनेरा रेल्वे स्टेशनवरून जाणार्या अनेक गाड्यांचा थांबा बडनेरा व अमरावती येथे दिला. त्याचप्रमाणे नवीन गाड्या सुद्धा अमरावती व बडनेरा रेल्वे स्टेशनवरून सुरू झाल्या. यातीलच एक बडनेरा ते नाशिक रोड मेमू गाडी बडनेरा येथून सकाळी 11 वाजून 5 मिनिटाला निघायची. त्यामुळे शेगावकडे जाणार्या अनेक भाविक भक्तांना शेगाव पोहचायला उशीर होत होता. शेगाववरून यायला रात्रीचा उशीर सुद्धा होत होता. तसेच बडनेरा ते नाशिकपर्यंत नियमित प्रवासी असून



विशेषतः नोकरदार वर्ग, विद्यार्थी व विशेषतः महिला वर्ग या हजारोच्या संख्येने प्रवास करीत असतात.त्यामुळे गाडीची वेळ 1 तास आधी सुरू करावी याकरिता सर्व प्रवासी मंच व नागरिकांनी माजी खा. नवनीत राणा यांच्याकडे निवेदन देत मागणी केली होती.

त्यामुळे सर्व प्रवाशांना होणारा त्रास बघता नवनीत राणा यांनी रेल्वे प्रशासनाकडे पाठपुरावा केला. त्यामुळे बडनेरावरून 11 वाजून 5 मिनिटांनी निघणारी बडनेरा ते नाशिक मेमू ट्रेन आता सकाळी 10 वाजून 5 मिनिटांनी निघणार असल्याचे परिपत्रक रेल्वे प्रशासनाद्वारे काढले व ही गाडी सकाळी 10 वाजून 5 मिनिटांनी सुरू करण्यात आली. त्यामुळे प्रवाशी, नागरिक, विद्यार्थी व विशेषतः महिलांनी नवनीत राणा यांचे आभार व्यक्त केले. यावेळी प्रवासी मंचचे पदाधिकारी सुभाष बाळे, डॉ. शैलेश जयस्वाल, डॉ. दिलीप सूर्यवंशी, बलगोविंद राठी, प्रा. चंद्रशेखर शेळके, डॉ. वनिता भोपत, डॉ. रोहित अग्रवाल, प्रा. आनंद पांडे, महेंद्र पिटे आदी उपस्थित होते.

# जबरी चोरीतील आरोपी 24 तासात जेरबंद

## 2 लाख 30 हजाराचा मुद्देमाल जप्त ● फ्रेजरपुरा पोलिसांची कामगीरी

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि. 18)** चाकुचा धाक दाखवून दोन तरुणाना मारहाण करीत, त्यांच्याजवळील मोबाईल व दुचाकी असा 2 लाख 30 हजाराचा मुद्देमाल जबरीने चोरून नेणार्या तीन आरोपींना अटक करण्यात फ्रेजरपुरा पोलिसांना चोविस तासात यश मिळाले. यश दिनेश भटकर (22, रा. न्यु विजय नगर, गोपाल नगर, अमरावती), साहिल गणेशराव गव्हाळे (19, रा.आदर्श नगर, गोपाल नगर, अमरावती) व हर्षद मनोजराव रामटेके (19, दोन्ही रा. आदर्श नगर, गोपाल नगर, अमरावती) अशी आरोपींची नावे आहेत. त्यांच्या ताब्यातून चाकूसह गुन्ह्यातील मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.



पोलिस सुत्रानुसार, वैभव संजय मालविये (17, रा. जनार्धन, पोस्टे राजापेठ अमरावती) हा त्याच्या मित्र नमन चांडकसोबत 17 एप्रिल रोजी महादेव खोरी परिसरातील मंगलधाम कॉलनी येथील टेकडीवरील हनुमान मंदिर परिसरात फोटो काढण्याकरीता गेले होते. त्यावेळी टेकडीवर तीन अनोळखी तरुण तेथे हजर होते. त्यांनी वैभव त्याच्या मित्राला पाहुन शिवीगाळ सुरू केली. त्यामुळे वैभव व त्याचा मित्र नमन हे घाबरून त्यांची दुचाकी सोडून पळुन गेले. परंतू त्या अनोळखी तरुणांनी वैभव व त्याच्या मित्राचा दुचाकीने पाठलाग सुरु केला. त्यानंतर त्यांनी वैभव व त्याच्या मित्राला नविन हायवेवरील श्रीकृष्ण मंदिराजवळ गाठले. त्यांनी वैभव व त्याच्या मित्राला थांबवून मारहान सुरु केली. दरम्यान एका तरुणाने वैभवच्या माडीवर लाकडी काठीने मारहाण केली आणि त्याच्याजवळील 1 लाख रुपये किमंतीचा आय फोन हिसकावून घेतला. तसेच वैभवचा मित्र नमन चांडक यांची सुझुकी कंपनीची अॅवनिस मोपेड वाहन क्रमांक एम.एच.27 डी.डब्लू 1530 व त्याच्याजवळील 10 हजार रुपये किमंतीचा मोबाईल फोन असा एकुण 2 लाख 30 हजाराचा मुद्देमाल मारहान करून तसेच चाकुने मारण्याचा धाक दाखवून जबरीने हिसकावून घेतला. त्यानंतर ते अनोळखी तरुण पळून गेले. या घटनेची तक्रार वैभव संजय मालवियेने फ्रेजरपुरा पोलिस ठाण्यात दिली. या तक्रारीवरून पोलिसांनी आरोपी यश वडतकरसह अन्य दोघांविरुध्द भारतीय न्याय संहिता कलम 309(6), 351 (2), 352, 3 (5) प्रमाणे गुन्हा दाखल करून तपासात घेतला. सदरच्या गुन्ह्याच्या तपासात फ्रेजरपुरा पोलिसांनी घटनास्थळावर जावुन पाहणी केली आणि गोपनिय माहीती काढली असता, या गुन्ह्यात यश दिनेश भटकर याचा सहभाग असल्याचे निष्पन्न झाले. या माहितीवरून पोलिसांनी यशला ताब्यात घेतले. त्याची सखोल चौकशी केल्यानंतर, त्याने साहिल गणेशराव गव्हाळे व हर्षद मनोजराव रामटेकेसोबत हा गुन्हा केल्याचे निष्पन्न झाले. त्यामुळे पोलिसांनी तिन्ही आरोपींना अटक केली. पोलिसांनी आरोपींच्या ताब्यातून गुन्ह्यात वापरलेले स्टील पात्याचा चाकु तसेच दोन मोबाईल व मोपेड वाहन असा मुद्देमाल जप्त केला.

### या पथकाची कामगिरी

सदरची कामगिरी पोलीस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी, पोलिस उपायुक्त कल्पना बारवकर, सागर पाटील, सहायक पोलीस आयुक्त कैलास पुंडकर यांच्या मार्गदर्शनाखाली फ्रेजरपुरा पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक निलेश करे, पोलीस निरीक्षक निलेश गावंडे, सहाय्यक पोलीस निरीक्षक रविंद्र सहारे, पोलिस उपनिरीक्षक राहुल महाजन, पोलिस हवालदार योगेश श्रीवास, हरीष बुदेले, पोलिस शिपाई शशिकांत गवई, हरिष चौधरी, रोशन वऱ्हाडे, जेयश परिवाले यांच्या पथकाने केली.

# चुरणी येथे सात जनावरे दगावली

## मृत्यूचे कारण अज्ञात

**महासागर प्रतिनिधी**

**चुरणी(18)** - चिखलदरा तालुक्यातील चुरणी येथील शेतकरी मुन्ना बिरजू धोत्रे यांच्या 7 पाळीव जनावरांचा मृत्यु झाला. ज्यामध्ये 2 गर्भवती गायसह 4 गाय व 3 गोऱ्हे होते. हे सात जनावरे यांच्या मृत्यूचे कारण अद्याप ही स्पष्ट झाले नाही.कोणीतरी शेतात यूरिया टाकले व य ते जनावरांच्या खाण्यात आले असावे. असा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. तलाठी येवले यांनी घटनेचा पंचनामा केला. पंचनामा मध्ये 1.80 लाखांचे अंदाज आर्थिक नुकसान झल्याची माहिती आहे. या घटनेने शेतकरी हवालदिल झाला आहे.






### राज्य दर्जा प्राप्त दवाखाना तरी शोकांतिका

चुरणी येथे राज्य दर्जाचा मोठा पशुवैद्यकीय दवाखाना आहे ,परंतु तो पूर्णपणे खंडर होत आहे. इथे कोणतेही उपचार होत नाही,कोणतेही पशुवैद्यकीय अधिकारी येत नाही. डॉक्टर या ठिकाणी राहत नाही.

# आडगाव खाडे येथील युवकावर कुऱ्हाडीने हल्ला

## युवक गंभीर जखमी, आरोपी फरार

**महासागर प्रतिनिधी**


**अंजनगाव सुर्जी, (दि. 18)** - अंजनगाव सुर्जी पोलीस स्टेशन अंतर्गत असलेल्या अडगाव खाडे येथील युवक प्रदीप इंगळे (वय 33)या युवकास जुन्या वादातून जबर मारहाण केल्याने गंभीर जखमी युवकास नागपुर येथे रुग्णालयात उपचारास दाखल केले आहे. गंभीर जखमी प्रदिप आरोपी शुभम श्रीकृष्ण इंगळे हे दोघेही अडगाव खाडे येथील रहीवासी आहेत. आरोपी याचा आदल्या दिवशी दि.14 ला गावातीलच रवी सरदार यांच्या सोबत वाद झाला.सदर वाद मिटवण्यास प्रदीप ब्रह्मदेव इंगळे यांनी मध्यस्ती करत रवी सरदार याची समजुत घालुन घरी नेले व वाद टाळला.दुसरे दिवशी दि.15 रोजी आरोपी शुभमने मनात राग धरून सकाळी आठच्या सुमारास घराजवळ येऊन प्रदीप इंगळे यांना शिवीगाळ केली.प्रदीप इंगळे यांनी शिवीगाळ का करतो अशी विचारना केली असता आरोपी शुभम याने प्रदीपचे डोक्यावर व पाठीवर कुऱ्हाडीने वार केले.प्रदीप इंगळे या हल्ल्यात गंभीर जखमी झाला त्यास नागपूर येथे उपचारस नेण्यात आले असुन फिर्यादी मीना सुनिल इंगळे (36)रा.अडगाव खा. हीचे तक्रारी वरुन आरोपी शुभम श्री.ईंगळे,श्रीकृष्ण तु.ईंगळे (वडील)त्याचे आई व बहीणी विरुध्द पोलीसांनी भा.न्या.स. कलम नुसार 109(1) 118(2)352, 351 (2) 3(5) जे व भा.द वी. कलम 307, 326, 504, 506, 34 गुन्हा दाखल करण्यात आला असुन चारही आरोपी फरार आहेत.

# आई-वडिलांना जीवे मारण्याचा धमकी देऊन मुलीचे लैंगिक शोषण

## 62 वर्षीय वृध्द इसमाविरुध्द गुन्हा दाखल

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि. 18)** आई-वडिलांना जीवे मारण्याची धमकी देऊन एका अल्पवयीन मुलीचे लैंगिक शोषण करण्यात आले. ही घटना वरुड पोलिस ठाण्याच्या हद्दीत 17 एप्रिल रोजी उघडकीस आली. पिडित मुलीच्या तक्रारीवरून वरुड पोलिसांनी आरोपी प्रकाश तुळशीराम पंडीया (62, रा. ता.वरुड) याच्याविरुध्द गुन्हा नोंदविला आहे. आरोपी हा पोस्टमन असल्याची माहिती पुढे आली आहे.




पिडितेच्या तक्रारीनुसार, ती घरात एकटी असताना आरोपी प्रकाश पंडिया हा तिच्या घरी गेला. त्याने मुलीला आई-वडिलांना जीवे मारण्याचा धाक दाखविला. त्यानंतर जबरदस्तीने मुलीशी शारिरिक संबंध प्रस्थापीत केले. आरोपीने वारंवार शारिरिक संबंध प्रस्थापीत केल्याने मुलगी त्रस्त झाली होती. अखेर तीने 17 एप्रिल रोजी वरुड पोलिस ठाणे गाठून तक्रार दिली. त्यानुसार पोलिसांनी आरोपी प्रकाश पंडियाविरुध्द गुन्हा नोंदविला असून, त्याला अटक केली आहे.

# अति तापमानामुळे आंबिया बहाराची संत्रा गळती

## उत्पादकांची चिंता वाढली

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि. 18)** तापमानामध्ये सातत्याने वाढ होताना दिसत आहे. सोबतच वातावरणातील बदलामुळे संत्रा फळ गळती होत आहे.



तिवसा तालुक्यात 42 ते 43 डिग्री अंश सेल्सिअस तापमानाचा फटका संत्रा उत्पादकांना बसत आहे. झाडावरच संत्रा फळ पिवळे होत आहे. उपाय योजना करून सुद्धा काही फरक दिसत नाही. यावर्षी आंबिया बहाराचे उत्पादन कमी असताना अति तापमानामुळे शेतकर्यांसह संत्रा उत्पादक हवालदिल झाले आहे. रस्ते रुंदीकरणामुळे मोठे झाड कापले गेल्याने रस्ते ओस पडू लागले, आणि हवामानात बदल झाला आहे. दुपारी शेतावर मजूर जात नाही. फक्त शेतकरी शेतात दिसत आहे. हल्ली शेतातील वीज उन्हात दिली असल्याकारणाने शेतकरी संत्रा झाडाना ओलित करताना दिसत आहे. 42 ते 43 डिग्री अंश सेल्सिअस तापमानात शेतकरी उन्हाच्या झळा सोसून शेतात संत्रा फळझाडांना ओलित करीत आहे. तरी सुद्धा संत्रा फळगळती अजून थांबलेली दिसत नाही. तिवसा तालुक्यात अंदाजे 2 हजार 800 हेक्टर जमिनीवर संत्रा असून आंबिया आणि मृग असे दोन बहाराचे संत्रा उत्पादन घेतल्या जाते. मात्र, अजून 5 महिने बाकी असताना तापमानामुळे संत्रा झाडावर फळ राहणार की नाही याची चिंता शेतकर्याला आहे.

गतवर्षी गारपिट आणि अतिवृष्टीमुळे आंबिया बहारासह मृग बहाराला फळ गळती झाल्याने फटका बसला होता, तर आता अति तापमानाचा फटका बसत आहे. उत्पादन कमी असताना फळगळती सुरू आहे. संत्रा शास्त्रज्ञ, कृषी विभाग यांनी संत्रा फळगळतीसाठी ठोस उपाययोजना शोधावी, अशी मागणी होत आहे. तसेच कार्यशाळा घेऊन काय उपाय शोधता येईल ते शेतकर्यांना सांगावे, अशीही अपेक्षा व्यक्त केल्या जात आहे. नैसर्गिक आपत्तीमुळे चविष्ट गोड संत्रा आज हद्दपार होण्याच्या मार्गावर असल्याने शेतकरी धास्तावला आहे.

## गळफास लावून तरुणाची आत्महत्या

**अमरावती** - भातकुली पोलिस ठाण्याच्या हद्दीतील गणोरी गावात एका तरुणाने गळफास घेऊन आत्महत्या केली. दिलीप श्रीकृष्ण वाघमारे (40, रा. गणोरी, भातकुली) असे मृताचे नाव आहे. दिलीपने राहत्या घरी स्वयंपाक खोलीत गळफास लावून आत्महत्या केल्याच्या माहितीवरून पोलिसांनी घटनास्थळ गाठले आणि पंचनामा केला.

# वरुडच्या शेतशिवारातील विहिरीत आढळला बेपत्ता तरुणाचा मृतदेह

## आत्महत्या केल्याचा अंदाज

**महासागर प्रतिनिधी**

**वरुड (दि. 18)** - तालुक्यातील मुलताई रोडवरील खंडेलवाल यांच्या शेतातील विहिरीत 18 एप्रिल रोजी दुपारी एका तरुणाचा मृतदेह आढळून आल्याने खळबळ उडाली आहे. प्रतिक अनिलराव शिंगरवाडे (30, रा. खडकपेठ, वरुड) असे मृताचे नाव आहे. प्रतिक हा सहा महिन्यापासून बेपत्ता होता. त्यामुळे त्याच्या मृत्यूमुळे वरुड तालुक्यात खळबळ उडाली आहे. प्रतिकने आत्महत्या केली असावी, अशी शक्यता वर्तविण्यात येत आहे.

प्रतिक हा पत्नी व आई-वडिलासह राहत होता. परंतू गेल्या सहा महिन्यापासून तो बेपत्ता होता. त्यामुळे तो बेपत्ता असल्याची तक्रार कुटुंबीयांनी वरुड पोलिस ठाण्यात दिली होती. अशातच 18 एप्रिल रोजी दुपारी मुलताई रस्त्यावरील एका शेतातील विहीरीतून दुर्गंधी येत होती. त्यावेळी काही जणांनी विहिरीची पाहणी केली असता, त्यात अनोळखी ईसमाचा मृतदेह आढळून आला. या घटनेची माहीती वरुड



पोलिसांना मिळाल्यानंतर त्यांनी घटनास्थळ गाठले. त्यानंतर विहिरीत कुजलेल्या स्थितीतील मृतदेह बाहेर काढण्यात आला. मृताच्या कपड्यावरुन तो मृतदेह प्रतिकचा असल्याचे निष्पन्न झाले. प्रतिकचा मृतदेह सापडल्याने खळबळ उडाली. त्याचा मृतदेह शवविच्छेदनासाठी ग्रामिण रुग्णालयात पाठविला. याप्रकरणात ठाणेदार अर्जुन ठोसरे पुढील तपास करीत आहे. ही हत्या की आत्महत्या अशी चर्चा सुध्दा वरुड तालुक्यात सुरु झाली आहे.

### 7 मार्चपासून प्रतिक होता बेपत्ता

7 मार्च 2025 रोजी बाहेरुन येतो, असे सांगुन प्रतिक हा घरुन बाहेर गेला होता. त्यानंतर तो घरी परतला नाही. कुटूंबियांनी त्यांचा सर्वत्र शोध घेतला. नातेवाईकांकडे फोनव्दारे व प्रत्यक्ष भेटून प्रतिकबाबत चौकशी केली. परंतू तो मिळून आला नाही. अखेर प्रतिक कुठेच आढळून न आल्याने पोलिस स्टेशन गाठून प्रतिक हरविल्याबाबत तक्रार दाखल करण्यात आली. गेल्या सव्वा महिन्यांपासुन प्रतिकचे कुटूंब सर्वत्र त्याचा शोध घेत होते. अशातच मुलताई रस्त्यावरील एका विहीरीतून दुर्गंधी येत असल्याचे काही नागरिकांच्या लक्षात आले. नागरिकांनी विहीरीत डोकावुन बघितले असता त्यामध्ये कुजलेल्या स्थितीत मृतदेह दिसला. प्रतिकने विहीरीत उडी घेवुन आत्महत्या केली असावी, असा अंदाज व्यक्त केल्या जात आहे.


आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती

मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक ( पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील ) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४

# जनमानसातील आमदार डॉ. सिद्धार्थ खरात



सध्याचे बदललते राजकारण, नेत्यांची भाषा, नेत्यांनी केलेला स्वतः च्या नातेवाईकांचा विकास बघितला तर लोक प्रत्येक नेत्याकडे नेता म्हणून नाही तर स्वतःचे व नातेवाईकांचे घर भरणारा स्वार्थी, जनतेच्या समस्येची जाणिव नसलेला निर्दयी व्यक्ती म्हणून आज नेत्यांची सर्वसामान्य जनतेत ओळख निर्माण झाली आहे. परंतु सिद्धार्थ खरात याला अपवाद आहेत.

अनेक आजी माजी आमदार खासदार हे केवळ पक्षाच्या जोरावर किंवा पक्षातील नेत्यांच्या जोरावर स्वतः चे वर्चस्व मतदारसंघात निर्माण करण्याचा प्रयत्न करतात. जनतेच्या समस्या सोडवणे असते बाजूला आणि नेत्याला पोषक असे वातावरण मतदारसंघात निर्माण करण्यासाठी जो लोकप्रतिनिधी निवडणुकीत निवडून आलेला असतो तोच प्रतिनिधी गुन्हेगारी, व्यसन याला चालना देऊन, बेरोजगार तरुण आपल्या भोवती फिरावे म्हणून चुकीच्या कामाचे संरक्षण केले जाते.

निवडून आलेल्या आमदार खासदारांची भाषाही बदलते. बरेच आमदार खासदार मतदार संघातील गुन्हेगारी प्रवृत्ती च्या लोकांसोबत जास्त दिसतात पण सर्व सामान्य जनतेच्या समस्या सोडविण्यासाठी त्यांना वेळ मिळत नाही. सर्वसामान्य जनता आमदार खासदार यांना भेटायला व्याकुळ म्हणल्या पेक्षा त्रासुन जाते परंतु साहेब काही भेटत नाही. ते नेहमीच मिटींगमध्ये असतात. मतदारसंघातील लोकांच्या समस्येपेक्षा महत्वाच्या कोणत्या मिटींग असतात हे अजूनही जनतेला कळाले नाही.

परंतु डॉ. सिद्धार्थ खरात हे सर्वसामान्य जनतेच्या मनातील आमदार आहेत. याचे कारणही तसेच आहे. त्यांच्या भोवती गुन्हेगारी प्रवृतीच्या लोकांचे वलय नाही. डॉ सिद्धार्थ खरात हे जनतेच्या समस्या जाणून घेऊन त्यावर उपाय शोधुन समस्येचे निराकरण करतात.

डॉ. सिद्धार्थ खरात हे कोणत्या पक्षाचे आहेत हे महत्त्वाचे नाही. मी कोणत्याही पक्षाचा अधिकृत सदस्य नाही किंवा पक्षाच्या भुमिकेला समर्थन करत नाही. परंतु डॉ. सिद्धार्थ खरात यांनी आमदार म्हणून जी ओळख निर्माण करून आमदाराचे महत्व जनतेला आपल्या कामातून पटवून देत आहेत ते मात्र खुप छान आहेत.

डॉ. सिद्धार्थ खरात यांचा आणि राजकारणाचा प्रत्यक्ष संबंध मुळीच नाही. शिक्षणाच्या जोरावर अधिकारी होऊन प्रशासकीय सेवेत असतानाही त्यांनी सर्वसामान्य जनतेची कामे अगदी वेळेत करून अधिकारी कसा असावा हे सिद्ध करून दिले. प्रशासकीय सेवेत असतानाही त्यांनी जनतेच्या कामासोबतच फुले शाहु आंबेडकर चळवळीचे काम जोमाने केले.

चळवळीतील कोणताही कार्यकर्ता त्यांना भेटला तर चळवळीविषयी चर्चा करण्यासाठी ते विशेष वेळ देऊन सवोतीपरी सहकार्य सुद्धा करायचे. म्हणून डॉ. सिद्धार्थ खरात हे सुशिक्षित व चळवळीच्या लोकांना अगोदर पासुनच आवडायचे.

अनेक लोक कर्मचारी असले तरीही समाजासाठी आणि चळवळीसाठी वेळ देत नाहीत. स्वतःला व्यस्त दाखवतात. परंतु डॉ सिद्धार्थ खरात हे प्रशासकीय अधिकारी आणि विशेषतः मंत्रालयात असुन ही चळवळ व माणसांशी जवळ राहीले म्हणून त्यांना आदर सन्मान मिळतच होता. मान सन्मान पैशाने विकत घेता येत नाही. तो जबरदस्तीने मागुनही मिळत नाही तो कर्तृत्वाने कमवावा लागतो. हेच डॉ. सिद्धार्थ खरात यांच्या कडे बघितले की दिसून येते.

आपल्या प्रशासकीय सेवेचा राजिनामा देऊन प्रत्यक्ष समाजात जाऊन समाजाची सेवा करण्यासाठी ते राजकारणात आले. आमदार होऊन जनतेच्या प्रश्नांचे निरसन करण्याचे स्वप्न उराशी बाळगून त्यांनी निवडणूक ही लढली. कोणतीही राजकीय पार्श्वभूमी नसताना आणि पहिल्याच प्रयत्नात विधानसभा सदस्य म्हणून मेहकर मतदारसंघातुन निवडूनही आले.

जनतेने अराजकीय व्यक्तीला निवडून देणे म्हणजे परिवर्तन व त्या व्यक्तीवर किती मोठा विश्वास असेल हे दिसून येते. आहे हे केवळ साध्य झाले ते सिद्धार्थ खरात यांच्या स्वभावामुळे, त्यांच्या कार्यामुळे.

तिस वर्षांपासून एकांगी चालणाऱ्या राजकारणाला सिद्धार्थ खरात यांनी बदलून खरचं इतिहास रचला. खरं तर सिद्धांर्थ खरात निवडून आले हा तर इतिहास आहेच पण महत्वाचा मुद्दा अजून पुढे आहे तो म्हणजे निवडून आल्यावर त्यांनी जनतेचे काम करताना तो कोणत्या पक्षाचा आहे, कोणत्या जातीचा आहे बघितले नाही तर त्याची समस्या काय आहे ती समस्या सोडविण्यासाठी त्यांनी प्रामाणिक प्रयत्न केले.

आमदार फक्त पक्षातील कार्यकर्त्यांचे, नातेवाईक यांचेच काम करतात असा समाजाचा असलेला समज त्यांनी हानुन पाडला. आमदार हा जाती धर्माचा नाही, पक्षाचा नाही तर जनतेचा असतो हेच त्यांच्या कार्यातून दिसून येते. म्हणून जनतेचे काम मोठ्या उत्साहाने करतात.

त्यांच्या काम करण्याच्या पद्धतीने सर्वसामान्य जनतेच्या अपेक्षा वाढलेल्या आहेत. मतदारसंघातील सुशिक्षित बेरोजगार तरुणांनाही त्यांच्या कडून अपेक्षा आहेत. आज पर्यंत आमदार हा विशिष्ट लोकांचे काम करतो, विशिष्ट लोकांनाच भेटतो असा समज दुर झाल्याने ज्या लोकांनी तिन वर्षापासून ज्यांना सहकार्य केले ते लोकही आज डॉ. सिद्धार्थ खरात यांच्या बद्दल आपुलकीने बोलताना दिसतात.

स्वतःच्या पक्षाच्या कार्यकर्त्यांनी गुणगान गाणे हे समजू शकतो पण विरोधी पक्षातील लोकांनी आमदार चांगला आहे म्हणून चर्चा करणे आणि असाच आमदार पाहिजे असे बोलणे हे सगळे श्रेय त्यांचे कार्य यांना जाते.

एकही गुन्हा दाखल नसलेले आमदार डॉ. सिद्धार्थ खरात हे तरुणांमध्ये गुन्हेगारी व व्यसनाधीनता वाढू देत नाहीत ही आनंदाची बाब असताना त्यांच्या कार्या वर शेतकरी, शेतमजूर, छोटे मोठे व्यावसायिक सर्वजन खुश आहेत.

आमदाराबद्दल मतदार संघात सकारात्मक मत निर्माण करण्याचे काम आमदार सिद्धार्थ खरात यांनी केले. जनमानसात सन्मान मिळवून जनतेच्या कामाला वेग आला. सुशिक्षित आमदार त्यातही चळवळीचा कार्यकर्ता आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा खरा अनुयायी कसा असतो. हे दाखवून देण्याचे काम आमदार सिद्धार्थ खरात यांनी केले.

जनकल्याण व जनतेच्या समस्या सोडविण्यासाठी विरोधकांचा विरोध न करता विरोधकांना सोबत घेऊन जनता दरबार भरवणारे आमदार म्हणजे सिद्धार्थ खरात होत. निडर, परखड मत मांडून संविधान व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची योग्य मांडणी करणारे सिद्धार्थ खरात हे खरोखरच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे वैचारिक वारस आहेत. म्हणून त्यांच्या वर लिहण्याचा मोह आवरला नाही.

या मधून कोणत्याही पक्षाचा मी प्रचार मुळीच करत नाही. परंतु डॉ. सिद्धार्थ खरात हे संविधान व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे वैचारिक वारस असल्याने अशा लोकांमुळे परिवर्तन शक्य आहे. यासाठी थोडक्यात मत मांडण्याचा प्रयत्न केला. मतदारसंघातील विकास करण्यासाठी त्यांच्या कडून खुप अपेक्षा आहेत. हळूहळू सर्व समस्या सुटतील असा आशावाद लोकांमध्ये निर्माण झाला. म्हणून जनमानसातील आमदार म्हणून डॉ. सिद्धार्थ खरात यांची ओळख आहे.

■ ■ ■



विनोद पंजाबराव सदावर्ते
समाज एकता अभियान
रा. आरेगांव, ता. मेहकर
९१३०९७९३००

---

# अभ्यास आणि स्वविकास

आज आपण अभ्यासाच्या माध्यमातून आपला विकास कसा घडवून आणावा यावर काही बोलू...

त्या अनुशंगाने आपण अभ्यास करतांना स्वतःमध्ये काही विशेष गुण कसे येऊ शकतात किंवा आपल्यामध्ये असलेले गुण कसे वाढू शकतात, यांसंबंधी लक्षात आलेल्या काही बाबी आपण बघू.

**व्यावहारिक गुण कसे अंगी येतात?**

**व्यवस्थितपणा:** वह्या-पुस्तके ठरलेल्या ठिकाणी ठेवल्यास व्यवस्थितपणा हा गुण येतो.

**चांगली सवय लागणे :** जसा नामजप किंवा देवापुढे आरती प्रतिदिन केल्यावर ती पाठ होते किंवा त्याची सवय लागते, तसा अभ्यास प्रतिदिन केल्यावर त्याचीसुद्धा आपल्याला सवय लागते.

**एकाग्रता :** बराच वेळ एका ठिकाणी बसून अभ्यास केल्यावर एकाग्रता वाढते.

**संयम :** अभ्यास भरपूर असेल, तेव्हा धीर न सोडता तो पूर्ण कसा करावयाचा, हे शिकायला मिळते. यातून संयम वाढतो.

**प्रामाणिकपणा :** परीक्षेत एखाद्या प्रश्नाचे उत्तर नीट येत नसल्यास, ते दुसऱ्याचे न बघता ( म्हणजेच कॉपी न करता) स्वतःला येते, तेवढेच लिहिण्याने आपल्यामध्ये प्रामाणिकपणा विकसित होतो.

**बौद्धिक गुण कसे अंगी येतात?**

**नियोजनबद्धता :** अभ्यासाचे नियोजन केल्यास किती दिवसांत, किती तास अभ्यास केल्यावर एक विषय पूर्ण होईल, हे कळते. यामुळे आपल्याला नियोजन करण्याची सवय लागते.

**निर्णयक्षमता वाढणे :** दोन महत्त्वाच्या विषयांत कुठला विषय जास्त महत्त्वाचा आहे, हे ठरवावे लागते आणि त्यानुसार अभ्यासाला प्राधान्य द्यावे लागते. यामुळे निर्णयक्षमता वाढते.

**पूर्वसिद्धता,पूर्व तयारी करणे :** आधीपासूनच सर्व प्रकारची सिद्धता (तयारी) केली, तर परीक्षेच्या वेळी अतिरिक्त ताण येत नाही, हे समजल्याने कोणत्याही कामासाठी पूर्वसिद्धता करण्याची सवय लागते.

**वेळेचे महत्त्व समजणे :** उत्तरपत्रिका लिहितांना वेळ किती महत्त्वाचा आहे आणि त्यातही काही मिनिटेसुद्धा कशी महत्त्वाची आहेत, हे कळते.

**चांगले गुण कसे अंगी येतात?**

जसे की आपण काही लक्ष आपल्यापुढे ठेवले की आपोआपच आपल्या मध्ये काही गोष्टी अंगी येतात त्या म्हणजे,

**जिज्ञासूवृत्ती वाढणे :** प्रत्येक विषयात पुढचे पुढचे शिकायला मिळते आणि जिज्ञासाही वाढते.

**विचारून घेण्याची सवय लागणे :** एखादे सूत्र न कळल्यास ते शिक्षकांना विचारावे लागते.

**तत्परता :** मनात आलेली शंका शिक्षकांना तत्परतेने विचारायला शिकतो.

**इतरांकडे लक्ष न देणे :** एखादा प्रश्न किंवा शंका वर्गात शिक्षकांना विचारल्यास इतर विद्यार्थी हसतील, हे ठाऊक असूनही शंकानिरसन करून घ्यावे लागते.

**उत्साह वाढणे :** प्रतिदिन नवीन शिकायला मिळाल्यामुळे उत्साह वाढतो.

**सातत्य :** शाळेत / महाविद्यालयात प्रतिदिन जाणे आणि प्रतिदिन अभ्यास करणे, यांमुळे त्यात सातत्य येते.

**तळमळ वाढणे :** एखाद्या प्रश्नाचे उत्तर मिळाले नाही, तर त्याचे उत्तर मिळवण्याची तळमळ वाढते.

**स्वभावदोष-निर्मूलन :** उत्तरपत्रिका पडताळल्यावर (तपासल्यावर) शिक्षक चुका सांगतात, त्यामुळे स्वभावदोष (उदा. घाई करणे) कळतात आणि त्यांचे निर्मूलन करण्याची संधी मिळते.

**अहं-निर्मूलन :** गुण अल्प (कमी) मिळाल्यावर आपोआप अहं-निर्मूलन होते. मित्र / मैत्रीण यांना एखादा प्रश्न विचारल्यास त्यांनी एवढेही तुला येत नाही, असे म्हटल्यावर अहं-निर्मूलन होते.

**मनाविरुद्ध कार्य करणे :** अभ्यासाची इच्छा नसतांना अभ्यास करण्यास बसल्यावर मनोलय होण्यास साहाय्य होते. विषय आवडता असो कि नावडता त्याचा अभ्यास करावाच लागतो; म्हणून आवड-नावड घटते.

**दुसऱ्यांचे साहाय्य घेणे आणि त्यांना साहाय्य करणे :** एखादे कठीण गणित न कळल्यास अन्य विद्यार्थ्यांना विचारावे लागते, तसेच त्यांनाही एखादे गणित न कळल्यास साहाय्य करावे लागते.

**तळमळीने प्रार्थना करणे :** एखादा विषय जास्त अवघड असला, तर ईश्वराला ह्यमला खरंच काही येत नाही, तू साहाय्य करह, अशी तळमळीने प्रार्थना होते.

**अंतर्मुखता येणे :** अन्य विद्यार्थी जेव्हा जास्त गुण मिळवतो, तेव्हा मी कुठे मागे (कमी) पडलो, याविषयी अंतर्मुखतेने विचार होतो.

**कृतज्ञता वाढणे :** परीक्षेत अभ्यास केलेल्या भागावरच प्रश्न येतात, तेव्हा कृतज्ञता वाटते.

**त्याग :** अभ्यासाच्या दिवसांत पाहुणे आल्यास त्यांच्यासमवेत बाहेर फिरायला जाता येत नाही, त्या प्रसंगी आपण त्याग शिकतो.

**आनंद मिळणे :** अभ्यास मनापासून केला की, समाधान आणि आनंद मिळतो.

मित्रांनो, अभ्यास ही एक कला आहे, ह्या गोष्टी मी आपल्यापुढे ठेवल्यात आणि ह्या काही बाबींना लक्षात घेवून आपण तसे केल्यास त्यातून विकसित होणारे गुणही निश्चितच आपल्यात यावे,यासाठी मी परमेश्वराच्या चरणी व आपल्या प्रती कृतज्ञ आहे. हे सगळे गुण आम्हा सर्व विद्यार्थ्यांमध्ये येऊ देत, हीच प्रार्थना !

●●●●



प्रफुल्ल क. दाते

---

# उत्क्रांतीवादाचा जनक : चार्ल्स डार्विन

उत्क्रांती वादाचा जनक असे ज्यांना समजले जाते त्या चार्ल्स रॉबर्ट डार्विन यांचा आज स्मृतिदिन. १९ एप्रिल १८८२ रोजी त्यांचे निधन झाले होते.

चार्ल्स डार्विन हे विख्यात जीवशास्त्रज्ञ होते. त्यांनी मांडलेल्या उत्क्रांतीवादाच्या सिद्धांतात जगातील जीवसृष्टीची उत्पत्ती व विकासाची कशी प्रगती होत गेली हे शास्त्रशुद्धरित्या उलगडून दाखवले. चार्ल्स डार्विन यांचा जन्म १२ फेब्रुवारी १८०९ रोजी इंग्लंडमधील श्रॉपशायर परगण्यात झाला. त्यांचे वडील रॉबर्ट डॉक्टर तर आजोबा इमर्सन शास्त्रज्ञ होते.

शालेय जीवनात त्यांना रसायन शास्त्राची खूप आवड होती म्हणून आपल्या भावाच्या मदतीने त्यांनी आपल्या घराबाहेर एक छोटीशी प्रयोगशाळा उभारली होती तिथे ते तासनतास प्रयोग करीत बसत. ते असे एकाच जागेवर तासनतास प्रयोग करीत बसत असल्याने मित्र मंडळी त्यांची नेहमी टर उडवत. पण ते त्याकडे कायम दुर्लक्ष करीत.

त्यांना निसर्गाचीही खूप आवड होती. पुढे त्यांची डॉ ग्रांट यांच्याशी ओळख झाली. डॉ ग्रांट हे स्वतः प्रसिद्ध जीव शास्त्रज्ञ होते. १८२५ मध्ये डार्विन यांनी केंब्रिज विद्यापीठाच्या क्राईस्ट महाविद्यालयात नाव नोंदवून पदवी मिळवली. तिथे त्यांना कीटक व निसर्गातील जीव जिवाणूंच्या निरीक्षणाचा नाद लागला.

१८२६ मध्ये कॅप्टन किंगने दक्षिण अमेरिका संशोधनाची मोहीम आखली त्यात ते सहभागी झाले. त्या मोहिमेवर ते पाच वर्ष होते. तिथे त्यांनी निरनिराळे पक्षी, प्राणी, कीटक, जीवजंतू एकमेकांशी कसे वागतात. ते एकमेकांशी आणि निसर्गाशी कसे जुळवून घेतात याचे निरीक्षण व अभ्यास केला व तेथे उत्क्रांतीवाद, सहजीवन, बळी तो कान पिळी ही मूलभूत नैसर्गिक तत्वे ते शिकले.

याच दरम्यान माणसाचा मूळ पुरुष, चार पायी माकडपासून झाला असला पाहिजे असा विचार त्यांच्या डोक्यात घुमू लागला. त्यांनी याचे खूप संशोधन केले. वेगवेगळे प्राणी कसे निर्माण झाले यासंदर्भातही त्यांनी खूप संशोधन केले.

या संशोधनावर आधारित ओरिजन ऑफ स्पेसिस हा ग्रंथ त्यांनी लिहिला. या ग्रंथातच त्यांनी उत्क्रांतवादाचा सिद्धांत मांडला आहे. या ग्रंथाच्या १२५० प्रति एकाच दिवसात विकल्या गेल्या. या ग्रंथामुळे त्यांचे सर्वत्र त्यांचे नाव झाले. या ग्रंथात त्यांनी मांडलेला उत्क्रांतीवादाचा सिध्दांत बायबलच्या विरुद्ध जात होता म्हणून अनेकांनी या सिद्धांताला विरोध केला.

हा सिद्धांत बायबलच्या विरुद्ध जातो म्हणून त्याचा निषेध करण्यासाठी १८६० मध्ये ऑक्सफर्डमध्ये विलबर फोर्स या बिशपने सभा बोलावली.

डार्विन यांचा एकीकडे पुरोगामी विचारांचे लोक समर्थन करीत होते दुसरीकडे प्रतिगामी लोक विरोध करीत होते. पण या सर्व घडामोडींचा डार्विनवर कोणताही परिणाम होत नव्हता. त्यांचे संशोधन चालूच होते. बिशप डार्विनला कडाडून विरोध करीत असताना हक्सले डी हुकर हे शास्त्रज्ञ मात्र डार्विन यांची बाजू सडेतोड व सोदाहरण मांडत होते. त्यामुळे उत्क्रांती वादाच्या सिद्धांताला कडाडून विरोध करणाऱ्या बिशपला अखेर माघार घेऊन डार्विनचा सिद्धांत मान्य करावाच लागला.

●●●●



श्याम ठाणेदार
दौंड. जिल्हा पुणे.
९९२२५४६२९५

---

# गावखेड्यातील जिल्हा परिषद शाळांचा ऱ्हास

गावागावात शिक्षणाचे दीप उजळणाऱ्या जिल्हा परिषद शाळा आज अस्तित्वाच्या संकटात सापडल्या आहेत. जिथे गरीब आणि मध्यमवर्गीय कुटुंबांची मुले शिकून मोठी झाली, समाजासाठी कर्तृत्व गाजवले, तिथेच आज ओसाड पडलेल्या वर्गखोल्या आणि कुलूपबंद शाळा दिसत आहेत. शिक्षण क्षेत्रात घडणाऱ्या बदलांनी समाजाचा पाया हादरवला आहे आणि हे परिवर्तन नक्की योग्य दिशेने आहे का, याचा विचार करण्याची वेळ आली आहे.

**'शिक्षण' की 'शिक्षणाचा बाजार'?**

एकेकाळी जिल्हा परिषद शाळा म्हणजे ज्ञानाचे मंदिर असायचे. विद्यार्थ्यांना प्राथमिक शिक्षण देणाऱ्या या शाळांनी डॉक्टर, इंजिनियर, अधिकारी, शिक्षक, साहित्यिक घडवले. पण आज शिक्षणाच्या नावाने बाजार मांडला गेला आहे. खासगी शाळांचे जाळे एवढे विस्तारले आहे की, ग्रामीण भागातील पालकही त्याकडे आकर्षित होत आहेत.

मोहपाटीच्या जाळ्यात अडकून अनेक पालक आज महागड्या फी भरून आपल्या मुलांना इंग्रजी माध्यमाच्या खासगी शाळांत टाकत आहेत. पण प्रश्न हा आहे की, हे शिक्षण त्यांच्या मुलांना खऱ्या जगण्याच्या अनुभवाशी जोडत आहे का? यंत्रवत शिक्षण घेऊन मुले मोठी होत आहेत, पण त्यांच्यात जीवनसंघर्षाची जाण नाही, खऱ्या जगण्याची समज नाही, आणि शेवटी नोकऱ्यांसाठी धडपडणारी बेरोजगार पिढी तयार होत आहे.

**शिक्षण व्यवस्थेचे अपयश**

शहरातील आकर्षक शाळांनी ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना आपल्या जाळ्यात ओढले, आणि त्यामुळे गावातील जिल्हा परिषद शाळांची पटसंख्या झपाट्याने घसरली. विद्यार्थ्यांची संख्या कमी झाल्यामुळे अनेक शाळा बंद पडत आहेत. आज कित्येक गावांमध्ये जुने, ऐतिहासिक जिल्हा परिषद शाळांचे इमारती पडझड झालेल्या अवस्थेत उभ्या आहेत. शिक्षणाची गंगा जिथे वहायची, तिथे आता नीरव शांतता आहे.

**याचे परिणाम दूरगामी आहेत :**

१. गावातील शिक्षणसंस्था बंद होत आहेत, त्यामुळे शिक्षणाची उपलब्धता मर्यादित झाली आहे.
२. शेती व ग्रामीण संस्कृतीशी नाळ तुटत चालली आहे, शहरी शिक्षणाच्या ओढीने गाव सोडणारे लोक पुन्हा परतत नाहीत.
३. गरिबांच्या शिक्षणावर गदा येत आहे, कारण खासगी शिक्षण सर्वांना परवडणारे नाही.
४. गावकऱ्यांमध्ये सामाजिक विषमता वाढत आहे, कारण शिक्षणाच्या वर्गवारीमुळे गरिबांचे शिक्षण दुय्यम ठरते आहे.

**उपाय :** जिल्हा परिषद शाळांचे पुनरुज्जीवन हा काळाची गरज आहे. सरकार आणि समाजाने मिळून याचा गंभीर विचार केला पाहिजे. काही उपाय असे असू शकतात.

१. शासकीय शाळांचे आधुनिकीकरण : तंत्रज्ञानाच्या साहाय्याने जिल्हा परिषद शाळांना अधिक सक्षम बनवले पाहिजे.
२. गुणवत्तापूर्ण शिक्षण आणि इंग्रजी विषयावर भर : इंग्रजीचे महत्त्व लक्षात घेऊन जिल्हा परिषद शाळांमध्ये इंग्रजी शिक्षण सुधारले पाहिजे.
३. गावकऱ्यांचे जागृती अभियान : पालकांनी केवळ आकर्षणाने खासगी शाळांत मुलांना न पाठवता जिल्हा परिषद शाळांचे महत्त्व ओळखले पाहिजे.
४. सरकारी धोरणांचा पुनर्विचार : खासगी शाळांच्या बेकायदेशीर विस्तारावर नियंत्रण ठेवून, जिल्हा परिषद शाळांचे अस्तित्व टिकवण्यासाठी शासनाने पावले उचलली पाहिजेत.
५. गावातच रोजगार निर्मिती : शिक्षण आणि गावच्या अर्थव्यवस्थेचा विकास एकत्र साधल्यास गाव सोडण्याची गरजच उरणार नाही.

**'मोहपाटी'च्या भूलथापांना बळी पडू नका!**

शिक्षण हे केवळ नावाला इंग्रजी असणे नव्हे, तर ते अनुभवात्मक, संस्कारक्षम आणि जीवनाशी जोडलेले असले पाहिजे. गावाकडची शाळा केवळ शिक्षण देत नाही, तर तेथील निसर्ग, माती, नाती, जीवनमूल्ये आणि सामाजिक बांधिलकी शिकवते. म्हणूनच, जिल्हा परिषद शाळा वाचवणे ही फक्त सरकारची जबाबदारी नाही, तर प्रत्येक सुजाण नागरिकाची जबाबदारी आहे.

गावखेड्याच्या मुलांना त्यांच्या गावातच उत्तम शिक्षण मिळावे, त्यांच्यावर शहरीकरणाचे कृत्रिम ओझे टाकले जाऊ नये आणि शिक्षणाच्या नावाने बाजार मांडणाऱ्यांना रोखले जावे, हीच खरी काळाची गरज आहे! ■ ■

---

## वाचक लिहितात

# हवनाचे धार्मिक आणि वैज्ञानिक महत्त्व

हिंदू धर्मात हवन करण्यास विशेष महत्त्व आहे. प्राचीन काळापासून ही परंपरा चालू आहे. रामायण, महाभारत काळातच नव्हे तर त्या पूर्वीपासूनही हवन केले जात होते, याची अनेक उदाहरणे आहेत. अग्नीमध्ये विविध औषधी वनस्पती, तूप आणि अन्नधान्य यांची आहुती दिली जाते. हवनामुळे वातावरणातील दूषित घटक नष्ट होऊन वातावरण शुद्ध होते. हवन करताना होणाऱ्या मंत्रोच्चारांमुळे सकारात्मक ऊर्जा निर्माण होते. उच्चारित होणारे मंत्र व त्यातून निर्माण होणाऱ्या कंपनांमुळे मन शांत होते.

हवनासंदर्भात काही शास्त्रज्ञांनी संशोधन केले आहे. फ्रान्समधील ट्रेले नावाच्या शास्त्रज्ञाने आपल्या संशोधनात निष्कर्ष काढला की, हवन मुख्यतः आंब्याच्या समिधांनी केले जाते आणि आंब्याचे लाकूड जळल्यावर फॉर्मिक अल्डिहाइड नावाचा वायू उत्पन्न होतो. हा वायू हानिकारक विषाणू आणि जिवाणूंना नष्ट करून वातावरण शुद्ध करतो.

'टौटिक नावाच्या शास्त्रज्ञाच्या हवनविषयक संशोधनात असे आढळले की, अर्धा तास हवन केल्यास किंवा हवनाच्या धुराचा शरीराशी संपर्क झाल्यास टायफॉईडसारखे हानिकारक रोग पसरवणारे जिवाणू नष्ट होतात आणि शरीर शुद्ध होते.

'राष्ट्रीय वनस्पती अनुसंधान संस्थान, लखनौ येथील शास्त्रज्ञांना असे आढळले की, हवनामुळे वातावरणातील हानिकारक विषाणू आणि जिवाणूंचा नाश होतो आणि एकदा केलेल्या हवनाचा परिणाम एक महिना टिकतो.

एथ्नोफामाकोलॉजी या आंतरराष्ट्रीय संशोधन पत्रिकेत (२००७) प्रसिद्ध झालेल्या संशोधनानुसार, यज्ञामुळे केवळ माणसालाच नव्हे तर वनस्पती आणि पिकांची हानी करणाऱ्या जिवाणूंचाही नाश होतो.

नुकतेच इंडियन कौन्सिल ऑफ मेडिकल रिसर्च (ICMR)च्या वतीने जे. एल. एन. मेडिकल कॉलेज, अजमेर आणि श्रीराम इन्स्टिट्यूट यांच्या संयुक्त सहकार्याने केलेल्या संशोधनात असे आढळले की, जिवाणूजन्य रोग आणि त्यावरील उपचारांसाठी हवनचा धूर अन् त्याचा सुगंध रामबाण उपाय ठरत आहे. गुणवत्तापूर्ण साहित्य आणि औषधी वनस्पतींचा वापर करून केलेले हवन पर्यावरणातील हानिकारक जिवाणू नष्ट करते आणि व्यक्तीची रोगप्रतिकारक शक्ती वाढवते.

वरील सगळे संशोधन हे आजच्या काळातील शास्त्रज्ञांनी केलेले आहे. मात्र, हिंदु धर्मशास्त्रात अग्निहोत्र, विविध यज्ञ आणि त्यासमवेत वापरण्यात येणाऱ्या सामग्री या संदर्भातील माहिती विविध ग्रंथात आढळते. अगदी दररोज अग्निहोत्र केल्यास अणुबाँब पडल्यावर निर्माण होणाऱ्या लहरींपासूनही संरक्षण होऊ शकते, असेही पूर्वी सिद्ध झाले आहे.

आजही अनेक संत याविषयी मार्गदर्शन करतात. परंतु त्याचे महत्त्व आपल्याला तेव्हाच पटते, जेव्हा त्याबाबत शास्त्रीय पद्धतीने संशोधन झालेले आपल्यासमोर येते. प्रत्यक्षात, हिंदू धर्मशास्त्रानुसार सांगितलेल्या प्रत्येक कृतीमागे वैज्ञानिक दृष्टिकोन आहे.

ऋषीमुनींनी वेद आणि उपनिषदांमध्ये सांगितलेले ज्ञान केवळ धार्मिक नव्हे, तर पूर्णतः वैज्ञानिक आहे. म्हणूनच ऋषीमुनींच्या प्रती कृतज्ञता व्यक्त करून त्यांनी दिलेले ज्ञान आचरणात आणायला हवे.

■ सौ. प्रिया बागडदेव
छिंदवाडा.

---

# सुंदरता आणि निरोगी शरीरासाठी हा पदार्थ ठरेल फायदेशीर



उन्हाळ्यात आरोग्याची विषेश काळजी घ्यावी लागते. निरोगी शरीरासाठी आहारात पोषक आहाराचा समावेश करणे महत्त्वाचे असते.

जर शारीरिकदृष्ट्या कमकुवत वाटत असेल तर आहारात भाजलेल्या चण्यांचा समावेश करा. भाजलेले हरभरे आरोग्यासाठी अत्यंत फायदेशीर ठरतात. हरभरा आरोग्यासाठी वरदान मानले जाते. हरभऱ्यामध्ये भरपूर प्रमाणात प्रथिने, कॅल्शियम, जीवनसत्त्वे आणि खनिजांचा खजिना असतो, ज्यामुळे शरीर मजबूत होते.

भाजलेले चणे प्रथिने समृद्ध असतात आणि शाकाहारी लोकांसाठी हा एक उत्तम पर्याय आहे. भाजलेले हरभरे प्रथिने स्नायू तयार करतात आणि शरीराच्या दुरुस्ती प्रक्रियेत मदत करतात. शरीराला आवश्यक प्रथिने मिळतात, ज्यामुळे थकवा आणि अशक्तपणा दूर होण्यास मदत होते. भाजलेले हरभरा शरीराची रोगप्रतिकारक शक्ती वाढवण्यास मदत करते. त्यामध्ये असलेले लोह, जस्त आणि इतर पोषक तत्व शरीराला रोगांशी लढण्याची शक्ती देतात. भाजलेल्या हरभऱ्यात भरपूर फायबर असते, जे पचनसंस्था सुधारते. ज्या लोकांना पोटाच्या समस्या असतात त्यांच्यासाठी भाजलेले हरभरा हा एक चांगला घरगुती उपाय आहे. भाजलेल्या हरभऱ्यामध्ये असलेले अँटीऑक्सिडंट्स, लोह आणि जीवनसत्त्वे त्वचा निरोगी आणि चमकदार बनवतात. भाजलेले हरभरे केसांना मजबूत बनवते आणि केस गळती थांबवते.

भाजलेले हरभरे हृदयासाठी अत्यंत फायदेशीर ठरतात. त्यामध्ये आढळणारे मॅग्नेशियम आणि फोलेट रक्तदाब नियंत्रित करतात. भाजलेले हरभरे कोलेस्ट्रॉल देखील नियंत्रित करते. याचे नियमित सेवन केल्याने हृदयरोगाचा धोका कमी होतो. भाजलेले हरभरे खाल्लयाने साखरेची पातळी लवकर वाढत नाही. दररोज मूठभर भाजलेले हरभरे खाल्ल्याने रक्तातील साखर स्थिर राहते आणि इन्सुलिन संवेदनशीलता देखील सुधारते. ■ ■ ■

---

## अशोकायन

प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)



### अनामिक भय

मानवी जीवनाचं भविष्य
कुणालाच कळत नाही
म्हणून मनातील भय
भाऊ, कधी संपतच नाही . .

भितीचं करून भांडवल
भोंदु भरतात खिसे
कळतयं सारे हो पण -
वळत नाही कसे ? ..

टळेल इडा पिडा अन्
होईल सुखाचा संसार
या आशेनं प्रत्येक जण
घेतो गंडया दोऱ्याचा आधार . .

# रेल्वे गेट कायमचे बंद झाल्यामुळे शेतकरी, पशुपालकांची पंचाईत

## अंडरग्राऊंड रस्त्याचे काम पुर्ण होईपर्यंत रेल्वे गेट सुरू ठेवा | रेल रोको कृती समितीची मागणी





**महासागर प्रतिनिधी**
**चांदूर रेल्वे, ( दि.18 )-** शहरातील शिवाजी नगरातील रेल्वे स्टेशन जवळील उड्डानपुल सुरू झाल्यामुळे रेल्वे गेट कायमचे बंद करण्यात आले आहे. गेट कायमचे बंद झाल्यामुळे शेतकरी, पशुपालकांची पंचाईत झाली असुन अंडरग्राऊंड रस्त्याचे काम पुर्ण होईपर्यंत रेल्वे गेट सुरू ठेवावे अशी मागणी चांदूर रेल्वेच्या रेल रोको कृती समितीतर्फे मंगळवारी स्थानिक स्टेशन प्रबंधक मार्फत डीआरएम, नागपुर यांना पाठविलेल्या निवेदनातून केली आहे.

सदर रेल्वे गेट सुरू असतांना अनेक शेतकरी, शेतमजुर, पशुपालक रेल्वे गेटमधून बाहेर येणे - जाणे करीत होते. उड्डानपुलावरून जनावरे, बैलबंडी घेऊन जाणे धोक्याचे आहे. तसेच गेट जवळून काही अंतरावर बोगद्याचे काम सुरू असुन ते अद्याप पुर्ण झालेले नाही. त्यामुळे अंडरग्राऊंड बोगद्याचे काम पुर्ण होईपर्यंत रेल्वे गेट सुरू ठेवण्यात यावे अशी मागणी करण्यात आली असुन रेल्वे गेट तत्काळ सुरू न झाल्यास नाईलाजास्तव आंदोलन करावे लागेल असा इशाराही रेल रोको कृती समितीने रेल्वे विभागाला दिला आहे. निवेदन देतेवेळी रेल रोको कृती समितीचे अध्यक्ष नितीन गवळी, सदस्य मेहमूद हुसैन, बंडूभाऊ यादव, गजानन यादव, विनोद जोशी, भीमराव खलाटे, कैलास बाबर, संजय डगवार, महादेव शेंद्रे, प्रा. प्रसेन्नजित तेलंग, जगदीश सावध, हेमचंद बागमार, संतोष मगर, मारोतराव डोंगरे, सुरेश यादव यांसह शिवाजी नगर व परिसरातील शेतकरी, पशुपालक उपस्थित होते.

# कुष्ठरोग प्रतिबंध, निर्मूलनावर दोन दिवसीय प्रशिक्षण




**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, ( दि. 18 ) -** कोठारा लेप्रसी मिशन हॉस्पिटल आणि सहायक संचालक आरोग्य सेवा कुष्ठरोग कार्यालयातर्फे राष्ट्रीय कुष्ठरोग निर्मूलन कार्यक्रमांतर्गत अधिकारी आणि कर्मचारी यांचे दोन दिवसीय प्रशिक्षण कोठारा येथे पार पडले. %कुष्ठरोगासंबंधी अपंगत्व प्रतिबंध% यावर 16 आणि 17 एप्रिल रोजी हे प्रशिक्षण आयोजित करण्यात आले होते.

चव्हाण, आयएलईपी एनएलईपी कन्सल्टंट सुरेश धोंडगे आणि अलर्ट इंडियाचे श्री. अन्सारी यांनी कुष्ठरोगाचे विविध पैलू आणि प्रतिबंधात्मक उपायांवर मार्गदर्शन केले.

प्रशिक्षणात प्रत्यक्ष रुग्णांची तपासणी, रोगनिदान यासारख्या बाबींचे प्रशिक्षण देण्यात आले. जिल्हास्तरीय अवैद्यकीय पर्यवेक्षक दीपक गडलिंग यांनी प्रशिक्षणाचे महत्त्व सांगितले. अलर्ट इंडियाचे फिजिओथेरपिस्ट श्री. अन्सारी यांनी समाजामध्ये वावरताना %लेप्रसी माइंडसेट% ठेवून लोकांकडे पाहण्याची गरज व्यक्त केली. लवकर निदान आणि उपचार झाल्यास कोणत्याही व्यक्तीला कुष्ठरोगामुळे होणारे संभाव्य अपंगत्व टाळता येऊ शकते, असे त्यांनी सांगितले. सहाय्यक संचालक डॉ. पूनम मोहोकार यांनी कोठारा लेप्रसी मिशन हॉस्पिटलचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. मिलिंद चव्हाण, पंचानन गोरैन, मिलिंद चांदेकर आणि त्यांच्या चमूचे आभार मानले.

## पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचा दौरा



**अमरावती-** पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे हे शनिवार, दि.19 एप्रिल रोजी जिल्ह्याचा दौरा करणार आहेत. दौऱ्यानुसार, सकाळी 11 वाजता समाज कल्याण कार्यालय सभागृहात आदिवासी विकास विभागाची आढावा बैठक घेतील. दुपारी 12.30 वाजता छत्रपती शिवाजी महाराज सभागृह, वैद्यकीय महाविद्यालय परिसर, मोर्शी रोड येथील शिक्षक मेळाव्यास उपस्थित राहतील. दुपारी 2 वाजता समाज कल्याण कार्यालय सभागृहात सामाजिक न्याय विभागाची आढावा बैठक घेतील. दुपारी 3.30 वाजता एमआयडीसीचे अध्यक्ष किरण पातुरकर यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट देतील. त्यानंतर दुपारी चार वाजता सोयीने नागपूरकडे प्रयाण करतील.

# विधी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांची कृ.उ.बा.समितीला भेट



**महासागर प्रतिनिधी**
**वरुड, ( दि.18 )-** तालुक्यातील जरूड येथील श्रीमती राधाबाई खुटपळे विधी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी वरुड कृषी उत्पन्न बाजार समितीला अभ्यास भेट दिली. यावेळी विद्यार्थांना कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती नरेंद्र उर्फ बबलू पावडे, सचिव नंदकिशोर बोडखे यांनी कृषी उत्पन्न बाजार समिती चे कायदे व कृषी उत्पन्न बाजार समिती कशासाठी स्थापन झाली, त्याचे कार्य काय आहे या बाबत विस्तृत माहिती देऊन विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

त्यांनी सांगितले कृषी उत्पन्न विकास व विनियम अधिनियम 1963 अन्वये कृषी उत्पन्न बाजार समितीचे कामकाज चालत असून दैनंदिन कामकाज, शेतकरी, व्यापारी, अडते यांचा समतोल साधून शेतकऱ्यांचे शेत मालाला जास्तीत जास्त भाव कसा मिळून देता येईल व शेतकऱ्यांना अडत्या कडून चोवीस तासात पैसे मिळेल व अडत्याला व्यापाऱ्याकडून लवकर पैसे मिळेल या साठी कृषी उत्पन्न बाजार समिती चे सभापती, उपसभापती संचालक मंडळ नियंत्रण करून संबधित सर्व घटकांना न्याय कसा मिळेल यासाठी नेहमी तत्पर असतात. शेतकरी यांचे कल्याण यासोबतच शेतीच्या प्रगतीतची भूमिका व महत्त्व या संबंधी त्यांच्याकडून माहिती देण्यात आली. कृषी उत्पन्न बाजार समितीशी संबंधित सर्व माहिती विद्यार्थ्यांना पुरविली. यावेळी कृषी उत्पन्न बाजार समिती चे सभापती नरेंद्र उर्फ बबलू पावडे, उपसभापती बाबाराव मंगुळकर, सचिव नंदकिशोर बोडखे यांच्यासह विधी महाविद्यालयाचे प्रा. कमलनारायण उईके, निलेश गुर्जर, तौसीफ़ शेख, यश पाटणकर, रजत बोरकर, साक्षी कवटकर, गौरी श्रीवास, सुकेशिनी वाघमारे, रोशनी उप्परकर, दीपिका खोडे यांच्यासह इतरही शिक्षक आणि विद्यार्थी उपस्थित होते.

# विद्यापीठात आदिवासी अध्यासन केंद्र सुरू करा

## सिनेट सदस्या मयूरी जवंजाळ यांची मागणी



**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, ( दि. 18 ) -** संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रात आदिवासीबहुल भागही येतो. त्यामुळे आदिवासींच्या जीवनद्धतीवर अभ्यास करण्याच्या अनुषंगाने आदिवासी अध्यासन केंद्र सुरू करण्यात यावे, अशी मागणी सिनेट सदस्या मयूरी समीर जवंजाळ यांनी कुलगुरूंकडे निवेदनाद्वारे केली आहे. संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठात आदिवासी अध्यासन केंद्राची स्थापना करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील आदिवासी जमातीच्या संदर्भात संशोधन आणि त्यावर आधारित विकास या संदर्भात संशोधन करणे तसेच आदिवासीचे शोषण व त्यातून उद्भवणारी नविन आव्हाने, आदी गोष्टीचा अभ्यास या केंद्रामार्फत केला जावा. संशोधनाच्या सोबतच विस्तार सेवा आणि प्रबोधनाचेही कार्य या केंद्रामार्फत करण्यास मदत होईल. त्यामुळे सध्या सुरु शैक्षणिक सत्रात अध्यासन केंद्र तत्काळ सुरु करण्याची मागणी मयूरी जवंजाळ यांनी केली आहे.




# तीर्थ वानखडे हत्या प्रकरणातील आरोपींना फाशी द्या!

## रविनगरातील नागरिकांचा राजापेठ ठाण्यावर मोर्चा

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, ( दि. 18 )** रविनगर येथील तीर्थ वानखडे याची 14 एप्रिलच्या रात्री तीन आरोपींनी निर्घृण हत्या केली होती. याप्रकरणी पोलिसांनी तीन आरोपींना अटक केली आहे. या आरोपींना फाशीची शिक्षा व्हावी या मागणीसाठी गुरूवारी (दि.17) रविनगरातील नागरिकांनी सामूहिक पायदळ मोर्चा काढून राजापेठ पोलीस ठाणे गाठले. मागणीचे निवेदन पोलिस उपायुक्त गणेश शिंदे यांना देण्यात आले.

रविनगर येथील तीर्थ गजानन वानखडे याची 14 एप्रिल रोजी रात्री जुन्या वादातून धारदार शस्त्राने हत्या करण्यात आली होती. यामध्ये पोलिसांनी चेतन पिंजरकर, सूरज बागेकर, रोशन पिंजरकर यांना अटक केली आहे. 14 एप्रिलच्या रात्री तीर्थला फोन करून बोलावले आणि धारदार शस्त्राने त्याची हत्या करण्यात आली. तिन्ही आरोपींवर कठोर कारवाई करून त्यांना फाशीची शिक्षा द्यावी, या मागणीसाठी रविनगरातील नागरिकांनी रविनगर ते राजापेठ पोलिस ठाण्यापर्यंत पायी मोर्चा काढला. पोलीस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी यांच्या नावाने मागणीचे निवेदन पोलीस उपायुक्त गणेश शिंदे यांना देण्यात आले. या प्रकरणात राजकीय हस्तक्षेप करण्याचा प्रयत्न केला जात आहे. याकडे विशेष लक्ष देण्याची मागणी निवेदनात करण्यात आली. निवेदन देताना प्रभात सगणे, गजानन बोकाडे, अमोल नागरीकर, शुभम बानेवार, अंकुश धोटे, कपिल मोरे, संजय बोरकर, अमित राजगुरे, स्वप्नील डहाके, शशिकांत खंडारकर, हर्षल पेटे, रोहित बोकाडे, तेजस बाळापुरे आदी उपस्थित होते.

# सिध्दार्थ विद्यालयात डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती साजरी

## डॉ.मुकेश सरदार यांच्या व्याख्यानाचे आयोजन



**महासागर प्रतिनिधी**
**परतवाडा,( दि.18 ) -** राहुल व्यायाम प्रसारक मंडळ अमरावती द्वारा संचालीत सिध्दार्थ विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय परतवाडा येथे मोठया थाटात डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती साजरी करण्यात आली. या कार्यक्रम प्रसंगी कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय चिखलदरा चे असोसिएट प्रोफेसर डॉ. मुकेश सरदार यांचे व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. व्याख्यानाचा विषय डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शैक्षणिक तत्वज्ञान व एकविसाव्या शतकातील शैक्षणिक आव्हाने हा होता.

कार्यक्रमाचे सुत्रसंचालन मंजुषा मळसने, प्रास्ताविक विभागप्रमुख जयश्री खडके तर आभार पर्यवेक्षक दीपक कळसकर यांनी व्यक्त केले. कार्यक्रमाला शालेय विद्यार्थी, नागरीक, संत गाडगेबाबा शिक्षक व कर्मचारी पतसंस्था परतवाडा चे अध्यक्ष उध्दव कोकाटे, माजी शिक्षण सभापती मनोज जामनेकर, शाळा समिती सदस्या माधवी कोकाटे, एमसीव्हीसी विभाग प्रमुख देवानंद कुरळकर, जेष्ठ शिक्षक व शिक्षिका संजय गोगे, संगिता गणोरकर तसेच सर्व शिक्षक व कर्मचारी उपस्थित होते.

### पृथ्वीवर सर्वप्रथम ज्ञानाचे रोपटे लावणारी स्त्री आहे

प्रा.डॉ.मुकेश सरदार आपल्या व्याख्यानातुन अनेक शैक्षणिक विचारावर प्रकाश टाकत म्हणाले की, अश्मयुगामध्ये सर्व प्रथम शेतीचा शोध लावणारी ही स्त्री आहे. या पृथ्वीवर ज्ञानाचे रोपटे लावणारी सुध्दा प्रथम स्त्री आहे. त्यामुळे पुरुषांच्या तुलनेत स्त्री ला आपल्याला कधीच कमी न लेखता समतावादी विचार ठेवावे लागतील. डॉ.बाबासाहेबांच्या मते सिध्दार्थ गौतम बुध्द छत्रपती शिवाजी महाराज, संत कबिर, महात्मा फुले, संत गाडगेबाबा, पेरीयार, डॉ पंजाबराव देशमुख यांच्या विचारामध्ये समता आहे. त्यामुळे प्राथमिक शिक्षणापासुन हे समतावादी विचार विद्यार्थ्यांच्या मनावर रुजविणे गरजेचे आहे. आपल्या जीवनामध्ये दु:ख नष्ट करण्यासाठी व समता प्रस्थापित करण्यासाठी प्रत्येकाने आर्यसत्य अंगिकारावे असे आवाहन केले.

### तळागळातील विद्यार्थ्यांपर्यंत ज्ञानाची गंगा पोहोचविली

आपल्या अध्यक्षीय भाषनातुन प्राचार्य दिनेश मोहोड म्हणाले की, संस्थेचे संस्थापक अध्यक्ष मधुकरराव अभ्यंकर यांनी महापुरुषांच्या विचारांचा वसा घेवुन तळागळातील विद्यार्थ्यांपर्यंत ज्ञानाची गंगा सर्व सुविधांसह पोहोचविण्याकरीता शिक्षणाच्या पवित्र कार्यात स्व्तःला झोकून दिले. त्याकरीता परतवाडा अचलपुर या जुळ्या शहरातील शिक्षणाचे महत्व् जाणणारे समतावादी विचारसरणीच्या नागरीकांनी मदत केली. पर्यायाने या ठिकाणी शिक्षण घेतलेले अनेक विद्यार्थी शैक्षणिक, राजकीय, सामाजिक, व्यावसायीक तथा स्पर्धा परिक्षांच्या माध्यमातुन विवीध क्षेत्रात उच्च सेवेच्या पदांवर कार्यरत आहेत. तसेच अध्यक्ष क्षितिज अभ्यंकर व संचालीका शुभांगी अभ्यंकर यांचे मार्गदर्शनात तथा उच्च विभुषीत विद्या धारण केलेल्या शिक्षकांच्या माध्यमातुन या शाळेचा प्रवास अतिशय वेगाने सुरु असल्याचे सांगितले.

# चुरणीत भीषण पाणी टंचाई, रहिवाशांची वणवण भटकंती

## पाणी पूरवठा योजनेची विहीर आटली | पर्यायी उपाययोजनेबाबत प्रशासन उदासिन | टँकरने पाणी पूरवठ्यास टाळाटाळ | ग्रामस्थांमध्ये प्रचंड असंतोष



**महासागर प्रतिनिधी**
**चुरणी, ( दि. 18 ) :** मेळघाटातील चुरणी या गावाला पाणी पूरवठा करणाऱ्या योजनेची विहिर आटून कोरडी ठणठणीत पडल्याने येथे एक महिन्यापासून भीषण पाणी टंचाईचे संकट निर्माण झाले आहे. ग्रामस्थांना पाण्यासाठी दाहीदिशा वणवण भटकंती करावी लागत असून पर्यायी उपाययोजनेबाबत ग्राम पंचायत प्रशासन पूर्णत: उदासिन असल्याने ग्रामस्थांमध्ये मोठा असंतोष निर्माण झाला आहे. गावकऱ्यांच्या मागणीनंतरही टँकरने पाणी पूरवठा करण्यास टाळाटाळ केली जात आहे.

चुरणी गावाच्या परिसरातील तलाव उन्हाळ्यापूर्वीच कोरडे पडलेत. त्यामुळे भूगर्भातील जलसाठ्यावरही विपरित परिणाम झाला. विहिरींचे स्त्रोत आटल्याने चुरणीला पाणी पुरवठा करणारी विहीरही कोरडी ठणठणीत पडली आहे. सोबतच हातपंपांनाही पाणी नाही. उन्हाळा सुरु होण्यापूर्वीच गावात पाणी टंचाईच्या संकटाची चाहुल लागली होती. त्यावर मात करण्यासाठी पर्यायी उपाययोजना करण्यासाठी पाउल उचलण्याची मागणी ग्रामस्थांनी ग्राम पंचायत व संबंधित विभागाकडे केली होती. पण त्याकडे सपशेल दुर्लक्ष करण्यात आले. परिणामी आत येथील नागरिकांवर पाण्यासाठी पायपीट करण्याची वेळा आली आहे. पाणी टंचाईमुळे येथील संपूर्ण जनजीवनच विस्कळित झाले आहे. गावात टँकरद्वारे पाणी पूरवठा करुन ग्रामस्थांना दिलासा द्यावा, अशी मागणी ग्राम पंचायतकडे करण्यात आली असली तरी प्रशासनाकडून त्याबाबत टाळाटाळ केली जात असल्याने तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे.

वास्तविक वाढती लोकसंख्या आणि बदलत्या परिस्थितीमुळे आटत चाललेले पाण्याचे स्त्रोत यामुळे या भागात पाण्याची समस्या गेल्या काही वर्षांपासून हळूहळू वाढत चालली आहे. ही बाब लक्षात आल्यानंतर सुरुवातीलाच भविष्याचा वेध घेउन कायमस्वरुपी उपाययोजना केली जाणे गरजेचे होते. पण लोकप्रतिनिधींची उदासिनता आणि प्रशासनाची दिरंगाई व दुर्लक्ष यामुळे त्यासंदर्भात कुठले पाउलच उचलले गेले नाही. परिणामी आज येथील पाणी समस्येने उग्र रुप धारण केले असून त्याचा त्रास सर्वसामान्य नागरिकांना सहन करावा लागत आहे.

चुरणी गावात दहा ते बारा दिवसांनी पाणीपुरवठा होत आहे अपु ?या पाणीपुरवठ्यामुळे नागरिकांची व महिलांची वणवण सुरु आहे गावात काही ठिकाणी पैसे देऊन टँकरचे पाणी विकत घ्यावे लागत आता तरी ग्रामपंचायतला जाग येणार कि नाही असा प्रश्न उपस्थित होत आहे टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यात यावा असी महिलांची व नागरिकांची मागणी आहे.

> “रणी गावामध्ये सध्या निर्माण झालेली पाणीटंचाई कृत्रिम असून प्रशासन त्यासाठी सर्वस्वी जबाबदार आहे. जलस्त्रोत असूनही नियोजनाचा अभाव आणि ग्रामसेवकाचा निष्काळजीपणा यातून हे संकट निर्माण झाले आहे. ग्रामस्थांच्या अनेक तक्रारी असुनही प्रशासन आणि ग्रामसेवक या गंभीर प्रश्नाकडे दुर्लक्ष करित आहेत. भाजपने यासंदर्भात वेळोवेळी आवाज उठवला आहे. पण अद्याप ठोस कार्यवाही झाली नाही. जलस्त्रोतांची दुरुस्ती करुन दिर्घकालीन उपाययोजना राबाव्यात यासाठी आम्ही संघर्ष करणार आहे.
>
> **आलोक अलोकार,**
> **जिल्हा सचिव भाजयुमो**

# अतुल इंगळे यांची केसरिया हिंदू वाहिनीच्या प्रदेश प्रचारक पदी निवड



**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती,( दि.18 ) -** येथील सामाजिक कार्यकर्ते अतुल इंगळे यांची केसरिया हिंदू वाहिनी मुख्य मोर्चाचा महाराष्ट्र प्रदेश प्रचारक पदी निवड करण्यात आली. इंगळे यांनी सांगितले की, केसरीय हिंदू वाहिनी ही एक गैर-राजकीय संघटना आहे, ज्याचे 30 राज्ये आणि 13 देशांमध्ये पदाधिकारी आहेत, जे संत, महात्मा आणि पुरोहितांच्या मार्गदर्शनाखाली वृक्षारोपण, गोसेवा, रक्तदान, रोटी बँक, महिला सक्षमीकरण, हिंदू मंडळाची स्थापना, गुरुकुलांचे बांधकाम, गोशाळा बांधणे, सनातनला बळकटी देणे अशी कामे सतत करत असतात. केसरीया हिंदू वाहिनी ही एक ट्रस्ट म्हणून नोंदणीकृत आहे आणि नीती आयोग, एमएसएमई मंत्रालय, बुद्धिमत्ता, मानवाधिकार, पर्यावरण, आरोग्य मंत्रालय तसेच आयकर विभाग यासह अनेक मंत्रालयांनी प्रमाणित केली आहे. केसरीया हिंदू वाहिनीला पूर्ण आयकर सूट आहे, यासोबतच केसरीया हिंदू वाहिनी कुटुंबाला लंडनच्या इंडिया ग्लोरी पुरस्कारानेही सन्मानित करण्यात आले आहे. केशरिया हिंदू वाहिनीचे संस्थापक, अतुल मिश्रा यांना यांच्या मार्गदर्शना अतुल इंगळे यांची निवड करण्यात आली आहे. या निवडीकरिता त्यांचे सर्वच स्तरातून अभिनंदन केले जात आहे.

# बालांगण

## का लागते मुंग्यांची रांग?

दोस्तांनो, तुम्ही मुंग्यांना रांगेत चालताना पाहिलं असेल. त्यांचं काम अगदी शिस्तीत सुरू असतं. आता या मुंग्या रांगेत का बरं चालत असतील? यामागचं तंत्र काय असेल असा प्रश्न तुम्हाला कधी ना कधी नक्कीच पडला असेल. चला तर मग, यामागचं कारण जाणून घेऊ. मुंग्या या सामाजिक सजीव आहेत. त्या वसाहती करून राहतात आणि संघटित सामाजिक आयुष्य जगतात. लाल मुंग्या घरातल्या भिंतींमध्ये घर करून राहतात. अन्नाच्या शोधासाठी त्या बरंच मोठं अंतर कापतात. घराकडे परतण्याचा मार्ग शोधण्यासाठी त्यांच्याकडे कोणताही नकाशा नसतो. त्यामुळे त्यांना वेगळ्या तंत्राचा वापर करावा लागतो.

वाचा तर खरं


अन्नाच्या शोधासाठी निघाल्यावर मुंग्या खूण म्हणून एक गंध सोडत जातात. या गंधामुळे त्यांना परतीचा मार्ग शोधता येतो. या मुंग्यांच्या प्रमुखाने सोडलेल्या गंधाचा माग काढत त्या चालतात. त्यामुळे त्या एका रांगेत चालतात. मुंग्यांचं हे तंत्र जाणून



घेण्यासाठी तुम्ही छोटासा प्रयोग करू शकता. मुंग्यांची रांग दिसली की त्यांच्या मार्गावर खोडरबर घासा. यामुळे हा गंध निघून जाईल. खोडरबर घासलेल्या ठिकाणी आल्यावर मुंग्या गोंधळून जातील. त्यांना मार्ग मिळणार नाही. त्या इकडे-तिकडे पळू लागतील, मार्गापासून भरकटतील. आपण कोणत्या दिशेला जायचं हे त्यांना कळणारच नाही. त्यामुळे पुढच्या वेळी भरकटलेल्या मुंग्या दिसल्या की यामागचं कारण तुम्हाला कळलेलं असेल.

## ॲप्सच्या मदतीने हसतखेळत शिका...

छोट्या दोस्तांनो, सणासुदीचे दिवस संपून आता परीक्षेचे दिवस जवळ येऊ लागले आहेत. सणासुदीनंतर आणि गॅदरिंगच्या आधी होणाऱ्या या परीक्षा अगदी नकोशा वाटत असल्या तरी जोमाने अभ्यास करावाच लागतो. त्यामुळे तुम्हीही आता जोरदार तयारीला लागला असाल. सहसा शालेय अभ्यासामध्ये गणित आणि विज्ञान हे अभ्यासक्रमातले महत्त्वाचे आणि काहीसे अवघड विषय असतात. या दोन्ही विषयांमध्ये बरीच सूत्रं लक्षात ठेवावी लागतात. यासाठी तुम्हाला बरीच मेहनत करावी लागते. पण आता काही ॲप्सच्या मदतीने तुम्ही गणित आणि विज्ञानातली सूत्रं लक्षात ठेऊ शकता.



✻ मॅथ्स फॉर्म्युला फ्री हे ॲप शालेय विद्यार्थ्यांसोबतच कॉलेजमधल्या विद्यार्थ्यांसाठीही उपयुक्त आहे. भूमिती, बीजगणितासोबत वरच्या वर्गातल्या गणिताची सूत्रं यात देण्यात आली आहेत. हे ॲप ३६ भाषांमध्ये उपलब्ध आहे.

✻ रसायनशास्त्रात चांगले गुण मिळवायचे असतील तर पिरियॉडिक टेबलची माहिती असणं गरजेचं असतं. पिरियॉडिक टेबल दर्शवणारी आणि वेळच्या वेळी अपडेट करणारी अनेक ॲप्स उपलब्ध आहेत.

✻ फॉर्म्युला लाईट या ॲपमध्ये गणितासोबतच रसायनशास्त्र आणि भौतिकशास्त्र या विषयांमधली सूत्रं देण्यात आली आहेत. हे ॲप अगदी सोप्या पद्धतीने वापरता येईल. या तिन्ही विषयांशी संबंधित रंजक माहितीही या ॲपवर मिळू शकेल. मग काय मित्रांनो, या ॲप्सचा वापर करा आणि गणित, विज्ञानात चांगले गुण मिळवा!

## नव्या वर्षाच्या स्वागताआधी...

दोस्तांनो, २०२३ हे वर्ष आता संपत आलं. जवळपास महिन्याभरात आपण नवीन वर्षाचं स्वागत करायला सज्ज होणार. अशा वेळी सरत्या वर्षाचा आलेख मांडणं खूप महत्त्वाचं असतं. यामुळे आपल्याला वर्षभरात काय काय केलं याचा आढावा घेता येतो. आपण कोणत्या बाबतीत अग्रेसर आहोत, आपल्याला काय जमत नाही याचं अवलोकन केलं की पुढच्या वर्षीचे संकल्प करायला सोपं जातं. त्यामुळे नवीन वर्षाचे संकल्प करण्याआधी जरा थांबा, सरत्या वर्षाचा आढावा घेण्याची तयारी करा. यासाठी काय करावं लागेल? तर एक वही किंवा डायरी घेऊन त्यामध्ये प्रामाणिकपणे काही गोष्टी नमूद कराव्या लागतील. घरामध्ये असलेली एखादी कोरी वही घ्या. त्यामध्ये वेगवेगळे भाग पाडा. पहिल्या भागामध्ये वर्षभरात तुमच्यासोबत घडलेल्या सकारात्मक घटना लिहा. त्याचा तुमच्यावर काय परिणाम झाला हे लिहू शकता. वहीच्या दुसऱ्या भागात वर्षभरातील परीक्षेमध्ये किंवा इतर स्पर्धांमध्ये मिळालेल्या यशाविषयी लिहा. यामध्ये एखाद्या उपक्रमावर मिळालेला छानसा शेरा किंवा परीक्षेत वर्गात आलेला पहिला नंबर किंवा वक्तृत्व स्पर्धेत मिळालेलं यश यापैकी काहीही असू शकतं. अभ्यासासोबतच कला, क्रीडा या क्षेत्रांमध्येही तुम्ही पारंगत होत आहात याचा आत्मविश्वास तुम्हाला हे लिहिल्याने येईल. यामुळे नव्या वर्षामध्ये अभ्यासावर आणि इतर कोणत्या उपक्रमावर लक्ष केंद्रित करायचं आहे हे ठरवणं सोपं जाईल. वहीच्या तिसऱ्या भागात तुम्हाला वर्षभरात जाणवलेल्या त्रुटींविषयी लिहा. यामध्ये वर्षभरात तुमच्याकडून झालेल्या चुका प्रामाणिकपणे लिहा. याचे दोन फायदे होतील. एक म्हणजे तुम्हाला प्रामाणिकपणे चुका कबूल करण्याची सवय लागेल आणि दुसरं म्हणजे या चुकांची पुनरावृत्ती होऊ नये यासाठी प्रयत्न करता येतील. वहीच्या चौथ्या भागात तुमच्या छंदांविषयी माहिती लिहा. तुम्ही आत्ता जोपासता ते छंद

वेगळं काही

आणि पुढच्या वर्षभरात जोपासायची इच्छा असलेले छंद अशी एक यादी तुम्हाला या भागात करता येईल. हे छंद जोपासण्यासाठी वर्षभरात किती वेळ द्यावा लागेल याचा अंदाज घेता येईल. वहीच्या पाचव्या भागात तुम्ही वर्षभरात केलेली प्रवासवर्णनं लिहा. तुम्हाला आवडलेल्या चित्रपटांविषयीही लिहू शकता. वहीचा पाचवा भाग कोणत्याही विषयावर लिहिण्यासाठी ठेऊ शकता. अशा पद्धतीने नवीन वर्षाचं स्वागत करण्याच्या आधी पूर्वतयारी करा.

## वजन किती असायला हवं?

आता डाएटिंगचं फॅड तुमच्यासारख्या छोट्यांपर्यंत येऊन पोहोचलं आहे! जाहिराती, चित्रपटांमधल्या कलाकारांना बघून आपणही त्यांच्यासारखंच बारीक असायला हवं, अशी मानसिकता तयार होऊ लागली आहे. यात लहान मुलंही मागे नाहीत. त्यामुळे आपलं वजन किती असायला हवं, असा प्रश्न उपस्थित होतो. बारीक असणं हे निरोगीपणाचं लक्षण असू शकतं का? या प्रश्नाचं उत्तर 'नाही' असंच द्यावं लागेल. प्रत्येक माणसाची शारीरिक ठेवण वेगवेगळी असते. प्रत्येकाच्या गरजाही वेगळ्या असतात. त्यामुळे खूप बारीक असणंही चांगलं नसतं. बारीक राहण्यासाठी तुम्ही खूपच कमी खात असाल तर ते चुकीचं आहे. अन्न हे आपल्या शरीराचं इंधन असतं. अन्नातल्या पोषक घटकांमुळे आपल्याला ऊर्जा मिळते. यामुळेच आपण वेगवेगळी कामं करू शकतो. जास्त बारीक असणं जसं चांगलं मानलं जात नाही तसंच खूप जाडही असू नये. वजन नियंत्रणात असणं गरजेचं असतं. तुमचं वय वाढत असतं. त्यामुळे शरीराला पोषक घटकांची आवश्यकता असते. म्हणूनच संतुलित आहार गरजेचा मानला जातो. फळं आणि भाज्या आरोग्यादायी असतात. त्यांचा समावेश



आहारात करायला हवा. वडा पाव, पिझ्झा, बर्गरसारखं जंक फूड बाजूला सारायला हवं. प्रत्येकाच्या शारीरिक ठेवणीनुसार त्यांचं वजन ठरतं. वजन किती असायला हवं हे उंचीनुसारही ठरवलं जातं. त्यामुळे लहान वयात वजनाची काळजी करायची तुम्हाला काहीच गरज नाही. शरीराला बळ देणारे पदार्थ खा आणि मस्त रहा.

जपा आरोग्य




## मार्केट रिसर्चच्या क्षेत्रात

विविध कंपन्या बाजारपेठा काबीज करण्याच्या प्रयत्नात असतात. कोणतं उत्पादन कधी बाजारात आणायचं, त्याचा ग्राहकवर्ग कोणता, उत्पादन कोणत्या पद्धतीने सादर करायचं याचं संशोधन करावं लागतं. याला मार्केट रिसर्च असं म्हटलं जातं. या क्षेत्रात करीअरच्या अनेक संधी निर्माण झाल्या आहेत. मार्केट रिसर्चची विभागणी तीन प्रकारांमध्ये करण्यात आली आहे. संशोधन, फिल्ड वर्क आणि डाटा



विश्लेषण असे हे तीन प्रकार होत. संशोधन या विभागात बाजारपेठेशी संबंधित समस्यांचा शोध घेऊन माहिती जमवावी लागते. संशोधनाचे अहवाल आणि प्रस्ताव तयार करण्याची जबाबदारीही याच लोकांवर असते. फील्ड वर्क अंतर्गत फोन, सोशल मिडियाच्या माध्यमातून किंवा घरोघर जाऊन सर्वेक्षण केलं जातं तर जमवलेल्या माहितीचा अभ्यास आणि विश्लेषण करून निष्कर्ष काढला जातो. मार्केट रिसर्चच्या क्षेत्रात विविध संस्था काम करत असतात. जगभरातल्या कंपन्या बाजारपेठेच्या माहितीसाठी या कंपन्यांची मदत घेतात. अशा कंपन्यांमध्ये तुम्ही विविध पदांवर नोकरी करू शकता. सरकारी क्षेत्रामध्येही बऱ्याच संधी आहेत. मार्केटिंग हा विषय घेऊन एमबीए केल्यानंतर तुम्ही या क्षेत्रात काम करू शकता.

कोण होणार?

## शरीरातील ऊर्जेचा असाही वापर!




माणसाच्या शरीरात प्रचंड ऊर्जा असते. या ऊर्जेचा वापर चांगल्या कामासाठी करता आला तर? यातून काही तरी चांगलं घडलं तर? हाच विचार शास्त्रज्ञांनी केला आणि मानवी शरीरातल्या ऊर्जेचा वापर करून गॅझेट्स चार्ज करू शकणाऱ्या टॅबची निर्मिती झाली. हा टॅब धातूपासून बनवण्यात आला आहे. अमेरिकेतल्या युनिव्हर्सिटी ऑफ बफेलोच्या शास्त्रज्ञांनी हा टॅब तयार केला आहे.

स्मार्ट टेक

एखादी वस्तू दुसऱ्या वस्तूच्या संपर्कात आल्यानंतर उत्तेजित होऊन ट्रायबोइलेक्ट्रिसिटीची निर्मिती करते. ट्रायबोइलेक्ट्रिसिटीचा वापर करण्यासाठी नॅनो जनरेटरची गरज असते. हा जनरेटर तयार करणं खूप कठिण आणि महाग असतं. पण या टॅबमुळे हा प्रश्न निकाली निघाला आहे. या टॅबमध्ये सोन्याच्या दोन पातळ पट्ट्यांच्या मध्ये पॉलिमर बसवण्यात आलं आहे. सोन्याच्या एका पट्टीची रचना वेगळ्या पद्धतीने करण्यात आली आहे. यामुळे ही पट्टी थोडी उंच वाटते. शारीरिक हालचालीमुळे या टॅबवर दाब पडतो. यामुळे सोनं आणि पॉलिमर यांच्यात घर्षण निर्माण होतं. या घर्षणामुळे सोन्याच्या दोन पट्ट्यांदरम्यान इलेक्ट्रॉनचा वावर वाढल्याने विजेची निर्मिती होते. यातून १२४ वोल्टची वीज उत्पन्न होते. एवढ्या विजेमुळे ४८ एलईडी दिवे एकत्रितपणे पेटू शकतात. या उपकरणात सोन्याची मोठी पट्टी बसवून जास्तीत जास्त विजेची निर्मिती करण्याचा शास्त्रज्ञांचा प्रयत्न आहे. तसंच या टॅबमधून उत्पन्न होणारी वीज बॅटरीमध्ये साठवून ठेवण्यासाठीचं तंत्रज्ञान विकसित करण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत.

## काडेपेटीचा रोबो

दोस्तांनो, घरातल्या काड्याच्या पेट्या तुम्ही कचऱ्यात टाकून देता. पण याच काडेपेट्यांचा वापर करून तुम्ही वेगवेगळ्या कलाकृती तयार करू शकता. काडेपेट्यांच्या मदतीने रोबो कसा तयार करायचा हे पाहु...



**साहित्य:** चार काडेपेट्या, काडेपेटीच्या काड्या, लाल, पिवळ्या किंवा तुमच्या आवडीच्या रंगांचे कागद, गम, कात्री

**कृती:** रंगीत कागदावर काडेपेटी ठेऊन तिच्या आकाराचे कागद कापून घ्या. आता हे कागद काडेपेटीवर चिकटवून घ्या. ही काडेपेटी म्हणजे रोबोचं तोंड असेल. एक काळा कागद घ्या. त्यापासून डोळ्यांचा आकार कापून घ्या. डोळ्यांच्या जागी हे आकार चिकटवा. रंगीत कागदापासून तोंडाचा आकार कापून तोही चिकटवा. आता उरलेल्या तीन काडेपेट्या घ्या. त्यांनाही रंगीत कागद चिकटवून घ्या. रोबोचं तोंड असलेली काडेपेटी उभी धरून वरच्या बाजूला दोन काड्या अडकवा. या काड्या म्हणजे रोबोची अँटिना असेल. आता तीन काडेपेट्यांपैकी एक आडवी धरून उरलेल्या दोन काडेपेट्या खालच्या बाजूला उभ्या चिकटवून घ्या. या काडेपेट्या म्हणजे रोबोचे पाय. रोबोचं तोंड असलेल्या काडेपेटीच्या खालच्या बाजूला छिद्र पाडा. तसंच आडव्या ठेवलेल्या काडेपेटीच्या मध्यभागी छिद्र पाडा. यात एक काडी अडकवा. यामुळे रोबोचं तोंड हलेल. झाला तुमचा रोबो तयार.

करून तर पहा

## तुम्हीच करा ट्रिप प्लॅन!

मुलांनो, तुम्हाला आता लवकरच नाताळच्या सुट्ट्या लागतील ना? या सुट्ट्यांमध्ये मस्त चार पाच दिवस फिरायला जाण्याचा प्लॅन असेलच ना? पण यावेळी काहीतरी वेगळं करून बघा. यावेळी आईबाबांकडे हट्ट धरण्याऐवजी तुम्हीच ट्रिप प्लॅन करा. सगळ्यात आधी सर्वांच्या सुट्ट्यांच्या तारखा जाणून घ्या. त्या तारखांमधून सर्वांना जमतील असे दोन-चार दिवस निवडा.



आईवडिलांकडून बजेटची माहिती घ्या. एकदा ट्रिपचं बजेट समजल्यावर त्यानुसार ठिकाण आणि हॉटेल शोधणं सोपं जाईल. यासाठी ट्रिप ॲडव्हायजर, मेक माय ट्रिप, गो आयबिबो, बुकिंग डॉट कॉम अशा ॲप्सची मदत घेता येईल. या ॲप्सवर हॉटेल कुठे आहे, मेन रस्त्यापासून किती आतमध्ये आहे, वाहतुकीच्या सुविधा कोणत्या आहेत हे सर्व नमूद केलेलं असतं. तसंच हॉटेलमध्ये कोणत्या सुविधा आहेत हेही नमूद केलं असेल. त्यानुसार तिथे वायफायसोबतच आणखी किती सुविधा आहेत हेही तपासून घ्या. कुठे राहायचं हे शॉर्टलिस्ट झाल्यावर आईबाबांचा सल्ला घ्या. हॉटेलचं बुकिंग करण्याआधी तिथे जाणाऱ्या ट्रेन आणि बसची चौकशी करा. प्रवास सोयीस्कर होणं महत्त्वाचं असतं. बस किंवा ट्रेन स्टेशनपासून राहण्याचं ठिकाण लांब असेल तर जाण्यायेण्यात अनावश्यक वेळ वाया जाऊ शकतो. त्यामुळे हॉटेल बुक करण्याआधी याचा विचार करा. पर्यटन स्थळांची यादी करा. तुमच्याकडे असणारा वेळ आणि पर्यटन स्थळं यांचा मेळ घालण्याचा प्रयत्न करा. कोणतंही बुकिंग करण्याआधी आईबाबांचा सल्ला घ्या. ज्या ठिकाणी जाणार आहात तिथला अभ्यास करून जा म्हणजे प्रवासाचा आणि ट्रिपचा मनमुराद आनंद लुटता येईल.

फन टाईम

## ओळखा पाहू...

जिज्ञासा

१) एकदिवसीय सामन्यात सर्वाधिक द्विशतकं झळकावणारा खेळाडू कोण?
२) दुबईत नुकत्यात सुरू झालेल्या जगातल्या सर्वात उंच हॉटेलचं नाव काय?
३) फॅथोमीटरने काय मोजलं जातं?
४) अंदमान बेटांच्या जवळ असलेला देश कोणता?
५) एमएस वर्ड काय आहे?
६) केंद्रिय अर्थसंकल्प सर्वात आधी कुठे सादर केला जातो?
७) भारताचं सर्वात पूर्वेकडचं राज्य कोणतं?
८) आवाज न करणारा प्राणी कोणता?
९) डीआरडीएचं पूर्णरूप काय?
१०) इंटरनेटचं पूर्ण रूप काय?

उत्तरं : १) रोहित शर्मा २) गेव्होरो ३) समुद्राची खोली ४) म्यानमार ५) ॲप्लिकेशन सॉफ्टवेअर ६)लोकसभेत ७) अरूणाचल प्रदेश ८) जिराफ ९) डिफेन्स रिसर्च ॲण्ड डेव्हलपमेंट ॲथोरिटी १०) इंटरनॅशनल नेटवर्क

## ठिपके जुळवा



### दोस्त हे मस्त

## गमती जमती प्राण्यांच्या

माणसाप्रमाणे गोरीलालाही सर्दी होते. तसंच त्यांना इतर आजारही होऊ शकतात. शहामृग घोड्यापेक्षा वेगाने पळू शकतं. तर नर शहामृग सिंहासारखी गर्जना करू शकतं. शरीराचा तोल सांभाळण्यासाठी कांगारू शेपटीचा वापर करतात. गायी उभ्या उभ्या झोपू शकतात पण बसून झोपल्यावरच त्यांना स्वप्नं पडतात.



### खादाडी

## कच्च्या तिळाच्या वड्या

आईला स्वयंपाकात मदत करताना तुम्ही तिळापासून छान चविष्ट पदार्थ बनवू शकता. यासाठी दोन कप तीळ, एक कप बेदाणे, अर्धा कप किसलेलं सुकं खोबरं, अर्धा कप जवस, अर्धा कप तूप, पाव कप खोबरेल तेल, एक टी स्पून व्हॅनिला इसेन्स, पाऊण चमचा मीठ हे साहित्य घ्या. सर्व कोरडे पदार्थ एका मोठ्या भांड्यात एकत्र करा आणि मिसळून घ्या. आता त्यात तेल, बटर तसंच इतर पदार्थ घाला. हलवून घ्या. आता एखाद्या ट्रेमध्ये हे मिश्रण ओतून घ्या. नीट दाबून बसवा. हा ट्रे फ्रीजरमध्ये ठेवा. थंड झाल्यावर त्याच्या वड्या तयार होतील. भूक लागली की या वड्या खा.



### लाईफस्टाईल

## ड्रायरचा वापर करताना...

दोस्तांनो, मॉलमध्ये किंवा हॉटेलमध्ये स्वच्छतागृहात गेल्यावर हात वाळवण्यासाठी ड्रायर असतो. या ड्रायरखाली हात धरल्यावर मस्त गरम हवा येते. तुम्हीही मग त्याखाली हात धरता. पण या ड्रायरमुळे रोग होण्याची शक्यता असते. ड्रायरमध्ये असंख्य बॅक्टेरिया असतात. हे बॅक्टेरिया तुमच्या हाताला चिकटून तोंडात जाऊ शकतात. त्यामुळे पुढच्या वेळी अशा ड्रायर्सचा वापर करताना काळजी घ्या



### योगा टाईम

## थायरॉइड टाळण्यासाठी...

थायरॉइड ही सध्याच्या काळातली सर्वसाधारण समस्या झाली आहे. सेतूबंधासन करून थायरॉइडला लांब ठेवता येतं. हे आसन करण्यासाठी पाठीवर झोपा. गुडघे दुमडून घ्या. दोन्ही पायांमध्ये अंतर ठेवा. आता शरीराला वर उचलायचं आहे. श्वास घ्यायला सुरूवात करा. पाठीचा खालचा भाग आधी वर उचला मग मधला आणि मग वरचा भाग वर घ्या. यूट्यूबवर बघून तुम्ही हे आसन करू शकता.



# सिलिंडर दरवाढीविरोधात आंदोलन




■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १८ :** काँग्रेस नेत्यांना त्रास देण्यासाठी अंमलबजावणी संचालनालयाचा (ईडी) दुरुपयोग, देशातील आर्थिक आणीबाणीपासून वाचवण्यासाठी आणि स्वयंपाक गॅस सिलिंडर, पेट्रोलच्या किमती कमी करण्याच्या मागणीसाठी काँग्रेस विचार जनजागृती अभियानतर्फे ज्येष्ठ समाजसेवक विजय लापलीकर यांच्या नेतृत्वाखाली व्हॅरायटी चौकातील महात्मा गांधी यांच्या पुतळ्याजवळ धरणे देण्यात आले.

आधीच आर्थिक संकटाशी झुंजणाऱ्या जनतेला मोदी सरकारने महागाईची आणखी एक भेट दिली आहे. आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाच्या किमती घसरल्या आहेत. त्यांचा फायदा जनेताला देण्याऐवजी सौगात ए मोदी सिलिंडरच्या किमतीत ५० रुपयांची वाढ केली. सरकार उत्पादन शुल्क वाढवत आहे. सध्या कमी किमतींवर उत्पादन शुल्क वाढवून सरकार तिजोरी भरत आहे.

यूपीएच्या काळात पेट्रोल आणि सिलेंडरच्या किमती थोड्या जरी वाढल्या तरी रस्त्यावर सिलिंडर ठेवून गोंधळ घालणारे भाजपचे सर्व आंदोलनजीवी नेते आज पसार आहेत. आणि या मुद्द्यांवरून देशातील लोकांचे लक्ष विचलित करण्यासाठी, मोदी सरकार सूडबुद्धीने काँग्रेस पक्ष आणि गांधी कुटुंबाच्या नेत्यांविरुद्ध ईडीमार्फत कारवाई करत आहे, असा आरोप यावेळी करण्यात आला.

२०१४ मध्ये मोदी देशाचे पंतप्रधान झाल्यानंतर, त्यांचे एकमेव उद्दिष्ट त्यांच्या निवडक उद्योगपतींना फायदा पोहोचवणे होते, ज्यामुळे देशाची अर्थव्यवस्था कोलमडली, रोजगार गेल्या ४५ वर्षातील सर्वात कमी पातळीवर पोहोचला आणि महागाई गगनाला भिडली.

अमेरिकेचे राष्ट्रपती डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतावर २६ टक्के कर लादल्याने बाजार उद्ध्वस्त झाला आणि शेअर बाजाराला एका तासात १६ लाख कोटी रुपयांचे नुकसान झाले. एलआयसी आणि बँकांनी शेअर बाजारात कोट्यवधी रुपये गुंतवले असूनही, डॉलरच्या तुलनेत रुपया दिवसेंदिवस घसरत आहे. त्यामुळे परकीय चलन साठ्याची कमतरता होते आहे. देशाचे सोने गहाण ठेवले आहे. भारतातील टॉप १० सर्वात मौल्यवान कंपन्यांच्या यादीतून एलआयसी बाहेर फेकल्या गेली आहे. परदेशी लोकांचा भारतीय शेअर बाजारावरील विश्वास उडाला आहे आणि ते त्यांचे पैसे काढून चीन आणि इतर देशांमध्ये गुंतवत आहेत, असे विजय लापलीकर म्हणाले.

यावेळी संघटनेचे समन्वयक तनवीर अहमद, रवी पराते, बाबा खान, संग्रामसिंह परिहार, ताराचंद हाडके, राजू जिवने, प्रकाश शेगावकर, श्याम बागुल, सुनील अग्रवाल, सोहन पटेल, दामोदर धमाळे, अब्दुल कदीर, गिरजाशंकर अग्रवाल, सूर्यकांत अग्रवाल, सूर्यकांत उईके, राजू पटेल, भट्टू कुर्यवंशी, आनंदसिंह बैस, रामप्रसाद गहरे, भीमराव हाडके यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## शिकारीच्या नादात वाघिणीने गमावला जीव



■ **महासागर प्रतिनिधी, भंडारा, दि. १८ :** चिखला या गावात एका वाघिणीने शिकारीसाठी रानडुक्कराचा पाठलाग केला पण यावेळी अंदाज चुकल्याने वाघीण आणि रानडुक्कर थेट विहिरीत पडले. विहिरीतून बाहेर न पडता आल्याने दोघांचाही मृत्यू झाला. ही घटना आज सकाळी उघडकीस येताच ग्रामस्थानी घटनास्थळी एकच गर्दी केली.

तुमसर वन परिक्षेत्राच्या गोबरवाही पोलीस ठाण्याच्या हद्दीत चिखला गावाबाहेर दोन ते तीन किलोमीटर अंतरावर एक मोठी विहीर आहे. आज सकाळी काही ग्रामस्थ विहिरीच्या बाजूने जात असताना दुर्गंधीमुळे विहिरीत डोकावून पाहिले असता ही घटना उघडकीस आली.

या घटनेची माहिती मिळताच गोबरवाही ठाण्याचे ठाणेदार शरद शेवाळे तात्काळ घटनेस्थळी पोहचले. ठाणेदार शेवाळे यांनी दिलेल्या माहितीनुसार, एक वाघीण रानडुकराचा पाठलाग करत असताना ते दोघेही विहिरीत पडले असावे. विहिरीत पडल्यानंतर वाघीण आणि डुक्कर दोघेही शिकारीची घटना विसरले. विहिरीतून सुखरूप बाहेर पडण्यासाठी दोघेही धडपडू लागले. त्यातच वाघाचे समोरील नखेही तुटली असावीत. अंदाजे दोन दिवसांपूर्वी ही घटना घडली असावी.

विहिरीतून बाहेर न पडता आल्याने दोघांचाही विहिरीतच मृत्यू झाल्याचा प्राथमिक अंदाज वर्तवण्यात येत आहे. शवविच्छेदनानंतर मृत्यूचे नेमके कारण स्पष्ट होईल असे ठाणेदार शेवाळे यांनी सांगितले.

## उच्च न्यायालयाने हटविले सिंगल यूज प्लास्टिक बॉटलवरील प्रतिबंध

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १८ :** मुंबई उच्च न्यायालयाच्या परिसरात पर्यावरणासाठी हानिकारक अशा सिंगल यूज प्लास्टिक बॉटलच्या वापरावर प्रतिबंध घालण्यात आला होता. उच्च न्यायालयाचे तत्कालीन मुख्य न्यायमूर्ती यांच्या निर्देशानंतर प्रतिबंधाबाबत परिपत्रक काढण्यात आले. मात्र उच्च न्यायालयाने आता हे परिपत्रक मागे घेत सिंगल यूज प्लास्टिक बॉटलचा वापर करण्याची परवानगी दिली आहे.

१६ एप्रिल रोजी मुख्य न्यायमूर्ती यांच्या आदेशानुसार प्रतिबंध हटविण्याबाबत नवे परिपत्रक काढले. त्यामुळे आता उच्च न्यायालय परिसरात येणारे नागरिक, वकील तसेच इतर लोकांना सिंगल यूज प्लास्टिक बॉटल बाळगता येणार आहे.

जुलै महिन्यात सिंगल यूज प्लास्टिकवर प्रतिबंधाचा आदेश आल्यावर वकील संघटनांनी या आदेशाला विरोध केला होता. डिसेंबर २०२४ मध्ये सुमारे दीडशे वकिलांनी मुख्य न्यायमूर्तींना पत्र लिहित सिंगल यूज प्लास्टिकवरील बंदी शिथिल करण्याची विनंती केली होती.

सिंगल यूज प्लास्टिकवरील प्रतिबंधाचा निर्णयाचा हेतू चांगला असला तरी यामुळे न्यायालयात येणाऱ्या लोकांना तसेच वकिलांना अडचणींचा सामना करावा लागतो. न्यायालयात ज्येष्ठ नागरिकांसह अतिशय दूरवरून प्रवास करून येणारे फिर्यादी असतात. न्यायालयात प्रवेश करताना प्लास्टिक प्रतिबंधाचे कारण सांगून त्यांची बॉटल जप्त करून फेकली जाते.

उच्च न्यायालय परिसरात सिंगल यूज प्लास्टिक बॉटल प्रतिबंधाबाबत व्यापक जनजागृती करण्यात आलेली नाही. त्यामुळे अनेकांना याबाबत काहीही माहिती नाही. सिंगल यूज प्लास्टिक बॉटल हा पाणी पिण्याचा स्वस्त आणि सहज स्त्रोत आहे. न्यायालयीन कायार्साठी अनेक लोक बराच कालावधी परिसरातच राहतात. न्यायालयत परिसरात अतिशय कमी प्रमाणात वॉटर फिल्टर बसविण्यात आले आहे. मात्र त्याचे पाणी पिण्यायोग्य आहे की नाही याबाबत नियमित तपासणी केली जात नाही.

पाण्याची बॉटल जप्त हा कचरा वाढत आहे. या बॉटलमधील पाण्याचा अपव्यवय होत आहे आणि कचऱ्यात अनावश्यक वाढ होत आहे. त्यामुळे प्रतिबंध हटविण्यात यावा, अशी मागणी करण्यात आली होती. मुख्य न्यायमूर्ती यांनी ही मागणी मान्य करत १६ एप्रिल रोजी नवे परिपत्रक काढले आणि सिंगल यूज प्लास्टिक बॉटलवरील प्रतिबंधाचा निर्णय मागे घेतला. प्लास्टिक बॉटलच्या वापरानंतर त्याची योग्य विल्हेवाट लावण्याची अट घालून देण्यात आली.

## पुलाच्या कठड्याला ऑटो धडकून १९ वर्षीय तरुणाचा मृत्यू

■ **वृत्तसंस्था, पुणे, दि. १८ :** शहरात कात्रज-कोंढवा रस्त्यावरील पुलाच्या कठड्यावर भरधाव वेगात रिक्षा आदळून प्रवासी तरुणाचा मृत्यू झाला. रिक्षाचालकाने अल्पवयीनाच्या ताब्यात रिक्षा चालविण्यास दिल्याने अपघाताची घटना घडल्याची माहिती पोलिसांनी दिली. याप्रकरणी रिक्षाचालकासह अल्पवयीनाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला.

रितेश शिवाजी गायकवाड (वय १९, रा. गोकुळनगर, कात्रज-कोंढवा रस्ता) असे मृत तरूणाचे नाव आहे. रिक्षाचालक साळुंके, अल्पवयीन, गायकवाड हे ओळखीचे आहेत. रिक्षाचालक साळुंकेने अल्पवयीन मुलाला रिक्षा चालवण्यास दिली होती. भरधाव रिक्षावरील नियंत्रण सुटल्याने रिक्षा पुलाच्या कठड्यावर आदळली. अपघातात रिक्षातील तरुण रितेश गायकवाड गंभीर जखमी झाला. उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला. याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला. सहायक पोलिस निरीक्षक एस शेंडे तपास करत आहेत.

# तटकरेंसाठी जनतेच्या पैशातून खास ४ हेलीपॅड का?



■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. १८ :** सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांच्यावर जोरदार हल्ला चढवला आहे.

यावेळी त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर निशाणा साधला. जनतेच्या कष्टाने कमावलेल्या कराच्या पैशातून सुनील तटकरेंसाठी खास हेलिपॅड? ती पण चार चार हेलिपॅड? असा सवाल अंजली दमानिया यांनी सोशल मीडियावर ट्विट करत उपस्थित केला.

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा १२ एप्रिल रोजी रायगड दौऱ्यावर होते. तेव्हा महाराष्ट्र शासनाकडून गृहमंत्र्यांच्या स्वागतासाठी रायगडमध्ये ४ हेलिपॅड उभारण्यात आले. त्यांच्या या दौऱ्यापूर्वी सुतारवाडी येथे ४ हेलिपॅड उभारणीसाठी राज्य सरकारच्या वतीने टेंडर काढण्यात आले होते. यावरून सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी राज्य सरकारला धारेवर धरले आहे.

जनतेच्या कष्टाने कमावलेल्या करायच्या पैशातून तटकरेंसाठी खास हेलिपॅड? ती पण चार चार हेलिपॅड? असा सवाल अंजली दमानिया यांनी केला. अमित शाह भेट वैयक्तिक होती. तो भार सरकारी तिजोरीवर कशासाठी? अमित शाह ना जेवायला घालायचय, खुशाल घाला. सोन्याच्या ताटात घालायचंय तरी घाला. ते आमच्या कष्टाच्या पैशाने कशासाठी? असेही दमानिया म्हणाल्या.

तटकरेंच्या अफाट कंपन्या आहेत ना? मग त्यांनी वैयक्तिक खर्च करावा. देवेंद्र फडणवीसांचे पुनःश्च अभिनंदन. सिंचन घोटाळा विसरून नवीन सरकारमध्ये खूपच चांगला ताळमेळ जाणवतोय, असा टोलाही अंजली दमानिया यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांना लगावला.

## : साप्ताहिक संवाद : आंतरराष्ट्रीय ऑलिम्पियाड मध्ये भारताचे दखलपात्र यश

खगोलशास्त्र आणि खगोल भौतिकी विषयात जगभरातील हुशार विद्यार्थ्यांमधून भविष्यातील खगोल शास्त्रज्ञ निर्माण व्हावेत याच दृष्टिकोनातून दरवर्षी जगभरातील विविध देशामध्ये खगोलशास्त्र आणि खगोल भौतिकी ऑलिम्पियाडचे आयोजन करण्यात येते. यंदाचे आंतरराष्ट्रीय आय व ए ए स्पर्धेचे यजमानपद मुंबईतील होमी भाभा सेंटर फॉर सायन्स एजुकेशन व टाटा इन्स्टिट्यूट ऑफ फंडामेंटल रिसर्च सेंटर याना मिळाले आहे. आजही राज्यातील बहुतांश शाळांमध्ये या स्पर्धेबद्दल अनभिज्ञता आहे. याच निमित्ताने या स्पर्धेच मार्गदर्शक आदित्य देसाई यांच्याशी आजचा साप्ताहिक संवाद.




**खगोल भौतिकी आणि ऑलिम्पियाड स्पर्धेचे स्वरूप नेमके काय असते?**

o आंतरराष्ट्रीय स्तरावरील हि स्पर्धा सध्या एकूण ११ विषयामध्ये होते. गणित, भौतिक शास्त्र, रसायन शास्त्र, माहितीशास्त्र, जीवशास्त्र, तत्वज्ञान, भूगोल, भाषा शास्त्र, पृथ्वी विज्ञान, कनिष्ठ विज्ञान, खगोल शास्त्र आणि खगोल भौतिकी अशा ११ विषयात ही स्पर्धा घेतली जाते. या परीक्षेत सदर विषयातील अत्यंत कठीण प्रश्न सोडवावे लागतात. यात उत्तम कामगिरी करणारे विद्यार्थी हे त्या विषयातील जगभरातील सर्वोत्तम विद्यार्थी मानले जातात. या स्पर्धेची रचना त्या त्या विषयानुसार बदलते. सर्वोत्तम कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांना पदक आणि प्रशस्तीपत्र देऊन गौरविले जाते.

**या स्पर्धेसाठी भारतीय विद्यार्थ्यांची निवड प्रक्रिया कशी होते?**

o ऑलिम्पियाडमध्ये वयोगटानुसार इयत्ता दहावी खालील आणि बारावी खालील असे विद्यार्थ्यांचे दोन गट आहेत. भारतीय विद्यार्थ्यांसाठी या दोन्ही गटाकरिता चार पाच टप्प्यांची निवड प्रक्रिया असते. प्रत्येक टप्प्यावर या विद्यार्थ्यांना कठीण परीक्षा द्यावी लागते. तसेच अंतिम टप्प्याआधी प्रशिक्षण शिबिरात सखोल मार्गदर्शन मिळते. त्यातून निवड होऊन हा संघ देशाचे प्रतिनिधित्व करण्यासाठी यजमान देशाकडे रवाना होतो. इंडियन असोशिएशन ऑफ फिजिक्स टीचर्स, होमी भाभा सेंटर फॉर सायन्स एजुकेशन, टाटा इन्स्टिट्यूट ऑफ फंडामेंटल रिसर्च सेंटर, कौन्सिल ऑफ सायन्स म्युझिअम या सारख्या संस्था भारतातील सर्व प्रवेश प्रक्रिया आणि परीक्षांचे काम पाहतात.

**या ऑलिम्पियाड स्पर्धेचे विद्यार्थ्यांना काय फायदे होतात?**

o ऑलिम्पियाड स्पर्धेत विचारपूर्वक आणि सखोल प्रश्न विचारतात,ज्यामुळे विद्यार्थ्यांची विषयाची समज वाढते. या परीक्षा विद्यर्थ्यांच्या विचार करण्याच्या पद्धतीला धार देतात आणि समस्या सोडविण्याचे कौशल्य विकसित करतात. जेईई,नीट,२ं३ अशा स्पर्धा परीक्षांसाठी आवश्यक असलेली तयारी आणि मानसिकता यामुळे तयार होते . यशस्वी विद्यार्थ्यांना पदके,प्रशस्तीपत्र आणि शिष्यवृत्ती देखील मिळू शकते. ऑलिम्पियाड यामधील यश हे विद्यार्थ्यांच्या बायोडेटा मध्ये महत्वपूर्ण यश ठरते. ■ ■ ■

## चिखलदऱ्याचे विलोभनीय सौंदर्य

चिखलदराच्या खोऱ्यात प्रत्येक बाजुला नवीन सावली आहे. चिखलदरा हे अमरावती जिल्ह्यातील लोकप्रिय पर्यटन स्थळ आहे. आणि हे हिल स्टेशन आपल्याला वन्यजीव, भूप्रदेश, तलाव आणि धबधबे यांचा भरभराटपणा प्रदान करते. चिखलदऱ्याजवळ अनेक प्रेक्षणीय पर्यटन स्थळे आहेत. त्याचे नाव किचका असे ठेवले गेले आहे. पांडुपुत्र भिमाने किचकाची हत्या केली आणि त्याला खोऱ्यात फेकले. अशा प्रकारे हे किचकदरा म्हणून ओळखले जाऊ लागले आणि हळूहळू ते चिखलदरामध्ये बदलले.

चिखलदरा खोल दऱ्यांनी परिपूर्ण आहे आणि या दऱ्या मखमली गवत, धुके आणि भव्य वृक्षांनी परिपूर्ण आहेत. चिखलदरा हे १,११८ मीटर उंचीवर वसलेले आहे आणि महाराष्ट्रातील एकमेव कॉफी उत्पादक प्रदेश असल्याने त्याला वेगळेपण आहे. या सर्व उपलब्धींमुळे ते उन्हाळ्याचे अमरावती जिल्ह्यातील लोकप्रिय पर्यटन स्थळ आहे. निसर्गसंपन्न, विलक्षण वन्यजीव, चित्तथरारक धबधबे आणि सरोवर असलेल्या चिखलदऱ्याचे सौंदर्य विलोभनीय आहे. ■ ■



## यूटीटी सीझन ६ लिलावात दिया चितळे ठरली सर्वोच्च बोली लावलेली भारतीय खेळाडू



सीझन ३ चे विजेते चेन्नई लायन्सने इंडियनऑइल अल्टिमेट टेबल टेनिस लिलावात चिनी खेळाडू फॅन सिकीला १९.७ लाख टोकन्स खर्चून सर्वाधिक महाग खेळाडू बनवले. UTT मध्ये प्रथमच खेळाडूंचा लिलाव होत असताना, भारताची अव्वल राष्ट्रीय खेळाडू दिया चितळे ही सर्वाधिक किंमतीची भारतीय खेळाडू ठरली. ती दबंग दिल्ली टीटीसीकडे तीव्र बोली युद्धानंतर राइट टू मॅच (आरटीएम) कार्डद्वारे १४.१ लाख टोकन्सच्या किंमतीने परतली.

गतविजेते गोवा चॅलेंजर्सने दुहेरी विजेतेपद मिळवणारे कर्णधार हरमीत देसाई यांना आरटीएमद्वारे १४ लाख टोकन्सच्या बोलीने पुन्हा करारबद्ध केले, जो त्याच्या मूळ किंमतीच्या दुप्पट आहे. सीझन २ चे विजेते दबंग दिल्ली टीटीसीने साथियन ग्यानसेकरनला १० लाख टोकन्सच्या यशस्वी बोलीने परत आणले. श्रीजा आकुला जयपूर पॅट्रियट्सकडे ११ लाख टोकन्स (आरटीएम) मध्ये परतली, तर अहमदाबाद एसजी पायपर्सने मणिका बत्रासाठी १२ लाख टोकन्सच्या यशस्वी बोलीने खरेदी केले. अंकुर भट्टाचार्जी आणि पायस जैन यांना अनुक्रमे कोलकाता थंडरब्लेड्स आणि चेन्नई लायन्सने 11.4 आणि 11.6 लाख टोकन्समध्ये खरेदी केले. ■

: संकलन व संयोजन :
सुबोध रणशेवरे, ९८३३१४६३५६
subodh.ranshevre @rediffmail.com

## मोबदल्याच्या पैशांसाठी जन्मदात्या वडिलांची हत्या

■ **महासागर प्रतिनिधी, अकोला, दि. १८ :** मेळघाट व्याघ्र प्रकल्पातील अनेक गावांचे पुनर्वसन करण्यात आले. या भागातील आदिवासींना राज्य शासनाकडून नुकसान भरपाईपोटी मोठी रक्कम देखील देण्यात आली. ही नुकसान भरपाईची रक्कमच कौटुंबिक वादाचे कारण म्हणून समोर आली आहे.

अकोट तालुक्यातील मोहपाणी गावात वडिलांना मिळालेल्या व्याघ्र प्रकल्पाच्या नुकसान भरपाईतील पैशांवरून पिता-पुत्रांमध्ये मोठा वाद झाला. या वादाने टोक गाठले. अखेर मुलाने आपल्या जन्मदात्या वडिलांवर कुऱ्हाडीने वार करून निर्घृण हत्या केल्याची धक्कादायक घटना गुरुवारी गावात घडली.

अकोला जिल्ह्याच्या अकोट तालुक्यातील काही भाग हा मेळघाट व्याघ्र प्रकल्पात जातो. या व्याघ्र प्रकल्पातील वाघासह इतर जनावरांना मानवी हस्तक्षेपाचा त्रास होऊ नये, म्हणून प्रकल्पातील अनेक गावांचे पुनर्वसन करण्यात आले. मेळघाट व्याघ्र प्रकल्पाच्या पुनर्वसनामध्ये जमिनी गेलेल्या आदिवासींना शासनाकडून नुकसान भरपाई देखील देण्यात आली.

नुकसान भरपाईपोटी लाखो रुपयांची रक्कम मिळाली. या रकमेवरून आता कौटुंबिक वाद होत आहेत. अकोट तालुक्यातील मोहपाणी या गावात पैशाच्या वादातून एका पुत्राने आपल्या पित्याचीच कुऱ्हाडीने वार करून निर्घृण हत्या केल्याचा प्रकार समोर आला आहे. मृत नरसिंग तेरसिंग जमरा यांना व्याघ्र प्रकल्पांतर्गत १३ लाख रुपयांची भरपाई मिळाली होती.

पैशांच्या वाटपावरून वडील व मुलगा यांच्यात सतत वाद होत होते. याच कारणावरून गुरुवारी पुन्हा पिता-पुत्रामध्ये मोठा वाद झाला. या वादातून हाणामारी झाली. यात रामसिंग नरसिंग जमरा याने वडिलांवर कुऱ्हाडीने जबर वार करून त्यांची निर्घृण हत्या केली.

या घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेतली. आरोपी रामसिंग याला ताब्यात घेतले. घटनेचा पंचनामा करून मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी रुग्णालयात पाठविण्यात आला.

या प्रकरणी मृताचे नातेवाईक मोहन नवलसिंग जमरा यांच्या फिर्यादीवरून भारतीय न्याय संहिता कलम १०३ (१) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई अकोट उपविभागीय अधिकारी मित्तल पोलिस अनमोल यांच्या मार्गदर्शनाखाली हिवरखेड पोलीस ठाण्याचे ठाणेदार गजानन राठोड, प्रमोद भोंगळ, अनंता मुळे, जवरिलाल जाधव, आकाश गजभारे आदींच्या पथकाने केली.

## राज ठाकरे विरोधात गुणरत्न सदावर्तेंची तक्रार

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १८ :** वकील गुणरत्न सदावर्ते यांनी हिंदीच्या सक्तीला विरोध करणारे राज ठाकरे यांच्याविरोधात पोलिसांत तक्रार दाखल केली आहे. राज ठाकरे स्वतःच्या गलिच्छ राजकारणासाठी हिंदीला विरोध करून भाषिक वाद निर्माण करण्याचा प्रयत्न करत आहेत. त्यांचे हे कृत्य गुन्हेगारी संहितेत बसणारे आहे. त्यामुळे मी त्यांच्याविरोधात पोलिसांत तक्रार दाखल केली आहे, असे त्यांनी म्हटले आहे.

गुणरत्न सदावर्ते तक्रार दाखल केल्यानंतर पत्रकारांशी बोलताना म्हणाले, राज ठाकरे मनसेत कोणत्या पदावर आहेत हे मला माहिती नाही. पण मी त्यांच्याविरोधात पोलिसांत तक्रार दाखल केली आहे. राज ठाकरे यांनी नव्या शैक्षणिक धोरणाला विरोध केला आहे. राज्य सरकारने हे धोरण राबवण्याचा निर्णय घेतला. पण राज ठाकरे यांनी स्वतःच्या गलिच्छ राजकारणासाठी व स्वतःच्या राजकीय फायद्यासाठी भाषिक वाद निर्माण करण्याचा घाट घातला. त्यांनी आपल्या ट्विटद्वारे शाळा व ग्रंथालये टार्गेट करण्याचे संकेत दिले. ही अत्यंत विदारक गोष्ट असल्याचे ॲड. गुणरत्न सदावर्ते यांनी म्हटले आहे.

# तीन महिन्यात झाले २० खून

■ **महासागर प्रतिनिधी, बुलढाणा, दि. १८ :** जिल्ह्याच्या गुन्हेगारी प्रवृत्तीत वाढ होत असून तीन महिन्यात तब्बल २० जणांचे खून झाल्याच्या घटना घडल्या आहेत.



चिखली तालुक्यातील अमडापूर पोलिस स्टेशनच्या कार्यक्षेत्रात एकाच रात्रीत दोन वेगवेगळ्या खुनाच्या घटना घडल्या आहेत. जुना वाद व पैशाच्या कारणावरुन हे खून आपसातीलच नातेवाइकांनी केले तर यापूर्वीचे खून वाळू तस्करी व अनैतिक संबंधातून झाल्याचे स्पष्ट झाले आहे. सरासरी सहा हुन अधिक घटना घडत असल्यामुळे जिल्हा हादरला आहे.

चिखली तालुक्यातील मंगरूळ नवघरे येथील अमोल दिगंबर मगर (वय ३३) या तरुणाचा त्याचा चुलत भाऊ पंकज राजेंद्र मगर (वय ३५) याने घरात घुसून लोखंडी बाजेच्या ठाव्याने जबर मारहाण केली. या हल्ल्यात गंभीर जखमी होऊन अमोलचा मृत्यू झाला. पोलिसांनी तात्काळ कारवाई करत आरोपीला अटक केली आहे.

अमोल व पंकज या दोघांमध्ये काही काळापासून पैशांच्या व्यवहारातून वाद सुरू होता. याच वादातून ही भयंकर घटना घडली असावी, असा संशय पोलिसांना आहे.

अमडापूर पोलिस स्टेशनला मृताचे दाजी सुधाकर दिनकर खपके (वय ४९) वर्षे राहणार मंगरूळ नवघरे यांनी तक्रार दिली की, माझ्या शेजारी सासू कोकिळाबाई मगर व साला अमोल दिगंबर मगर राहतात. पंकज मगर यास उसने दहा हजार रुपये परत मागितल्यामुळे दोन दिवसांपूर्वी त्या दोघांमध्ये वाद झाला होता. तेव्हा पंकज याने अमोलला जीवे मारण्याची धमकी दिली होती.

१६ एप्रिल रोजी सायंकाळी माझी सासु कोकिळाबाई व पत्नी सविता कटके या जोरजोराने ओरडत असल्याचा आवाज आल्याने मी लगेच धावत गेलो असता पंकज मगर हा त्यांच्या हातातील लाकडी दांड्याने पलंगावर असलेला अमोल मगर यांच्या तोंडावर मारत होता. सासू कोकिळाबाई मगर या अडवण्यास गेल्या असता त्यांनाही मारहाण पंकज मगर याने केली.

**शेत मालकीच्या वादातून हत्या**

दुसऱ्या घटनेत, अमडापूर येथे शेतीच्या मालकीवरून सुरु असलेल्या जुन्या वादातून संजय गुलाबराव जाधव (वय ४२) यांची हत्या अमोल जाधव याने धारदार शस्त्राने केली. आज सकाळी ही घटना उजेडात आली असून, घटनेनंतर आरोपी फरार झाला आहे.

खून करण्याची मानसिकता वाढत आहे या दोन घटनांनी जिल्हा हादरला असून, खून करण्याची मानसिकता वाढत असल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. केवळ तीन महिन्यांत २० खून होणे ही चिंताजनक बाब असून, जिल्ह्यात कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.